
सोमवार, ६ जून २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक ३१९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळून २२ भाविकांचा मृत्यू



**उत्तरकाशी :** उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात एक भीषण रस्ते अपघात झाला आहे. डामटापासून दोन किमी पुढे जानकीचट्टीजवळ एक बस रविवारी (दि. ५) संध्याकाळी खोल दरीत कोसळली. या अपघातात बसमधील २२ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील २८ यात्रेकरूंना घेऊन निघालेली बस उत्तरकाशी जिल्ह्यातील डामटाजवळ दरीत कोसळली. या अपघातात २२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यापैकी सहा जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर सहा जखमींना रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. हा अपघात नेमका कशामुळे झाला याबाबत माहिती मिळू शकलेली नाही. घटनास्थळी पोलीस पोहचले असून बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

**अंतरंग**

'मविआ'कडून नवी मुंबईची लूट -आ. गणेश नाईक/२

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम/३

माणगाव तालुक्यातील रिक्त पदांचे ग्रहण सुटेना/५

# उलवे सायक्लोथॉनला उदंड प्रतिसाद

## तबब्ल ९३४ सायकलपटूंचा स्पर्धेत सहभाग

## पुण्याचा प्रणव कांबळे आणि कोल्हापूरची रंजिता घोरपडे विजेते




(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..







पनवेल : हरेश साठे

**सर्वसामान्यांचा आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१वा वाढदिवस आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, उलवे सेना सामाजिक संस्था व सायकलिस्ट क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ५) उलवे नोडमध्ये झालेल्या भव्य उलवे सायक्लोथॉन २०२२ स्पर्धेत राज्यातील तब्बल ९३४ सायकलपटू स्पर्धकांनी सहभाग घेऊन उदंड प्रतिसाद दिला. स्पर्धेतील २५ किमीच्या गटात पुरुषांमध्ये पुण्याचा प्रणव कांबळे, तर महिलांमध्ये कोल्हापूरच्या रंजिता घोरपडे यांनी बाजी मारली.**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेस प्रमुख पाहुण्या म्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री स्वाती पानसरे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दीपक इंगोले, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे जनरल सेक्रेटरी वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपमहापौर सीताताई पाटील, पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, अजय भगत, हेमंत ठाकूर, सागर ठाकूर, जयवंत देशमुख, रवींद्र भगत, अनंता ठाकूर, भार्गव ठाकूर, सुहास भगत, सुधीर ठाकूर, विश्वनाथ कोळी, अंकुश ठाकूर, अवधेश महतो, सुहास भगत, मनोज मौर्य, शैलेश भगत, किशोर पाटील, कैलास कोळी, मोरेश्वर मोकल, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुजाता पाटील, शुभांगी पाटील, जयश्री घरत, मोरेश्वर पाटील, राजीव रंजन, अर्चना मिश्रा, सागर रंधवे, मंडळाचे कार्यालयीन व्यवस्थापक अनिल कोळी, श्यामनाथ पुंडे, उलवे सेना सामाजिक संस्थेचे शेखर काशीद, पल्लवी सुर्वे, सचिन आवटे, गुड्डू कनोजिया, मनोज सिंह, अमित झा, अनिल सनस, वांची एस, विकी भिडे, किरण लोहकरे, फरहान चॅटर्जी, डॉ. रवी दिघे, नित्यानंद पांडे, गोकुळ पुरी, रोषणी डिमेलो, सुवर्णा सनस, ज्योत्स्ना ठाकूर, सरोज मानवटकर, ओमकार कदम यांच्यासह पदाधिकारी, सायकलप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी सायकलिंग आयकॉन म्हणून ७१ वर्षीय राज शर्मा, ६८ वर्षीय रमाकांत महाडिक, १२ वर्षीय सई पाटील, तर जगभर सायकल भ्रमंती करणाऱ्या शितल बांबूलकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित ही स्पर्धा महिला व पुरुष यांच्या २५, १५, १० व तीन किमी अंतर अशा चार गटांत झाली. विशेष आकर्षण असलेल्या २५ किमी अंतराच्या पुरुष गटात प्रणव कांबळे याने प्रथम क्रमांक (२० हजार रुपये बक्षीस), द्वितीय कोल्हापूरचा प्रतीक पाटील (१० हजार रुपये), तृतीय मुंबईचा सिद्धार्थ लवंडे (पाच हजार रुपये), चतुर्थ रायगडचा निकेत पाटील (तीन हजार रुपये) व पाचवा क्रमांक सांगलीचा अमन तांबोळी (दोन हजार रुपये) याने पटकाविला. अनुप पवार, गिरीष पवार, अजित हिरकणी, हर्षल आहेर, पार्थ पेडणेकर यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. २५ किमी अंतराच्या महिला गटात प्रणव रंजिता घोरपडे हिने प्रथम क्रमांक (२० हजार रुपये बक्षीस), द्वितीय नाशिकची संस्कृती जाधव (१० हजार रुपये), तृतीय पुण्याची आदिती शिंदे (पाच हजार रुपये), चतुर्थ स्नेहल माळी (तीन हजार रुपये) व पाचवा क्रमांक घाटकोपरच्या विधी भानुशाली (दोन हजार रुपये) हिने पटकाविला. चैताली शिलधनकर, दिपाली भालेराव, अवणी नातू, सादिका शेख, जयश्री प्रसाद यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास टी-शर्ट व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी स्वयंसेवक व वैद्यकीय पथकाची व्यवस्था करण्यात आली होती तसेच या ठिकाणी झुम्बा मनोरंजनाचा लाभ प्रेक्षक व स्पर्धकांनी घेत मनमुराद आनंद लुटला. त्याचबरोबर तीन ते सहा वर्षांपर्यंतच्या लहान मुलांसाठी आयोजित करण्यात आलेली फॅन्सी ड्रेस स्पर्धाही विशेष आकर्षण ठरली. यात काव्या वाघ या चिमुकलीने प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकाविले.

या स्पर्धेच्या अनुषंगाने सोसायट्यांसाठी विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यातील ग्रीन सोसायटी स्पर्धेत प्रथम क्रमांक शंकेश्वर प्लाझो, द्वितीय भगवती इम्पोरिया, तृतीय क्रमांक प्रोग्रेसिव्ह आयकॉन; सर्वांत जास्त सोसायटी सहभाग स्पर्धेत प्रथम क्रमांक युफोरिया सीएचएस, द्वितीय ईशवर ऑरा, तृतीय क्रमांक पार्श्व हाईट आणि क्लीन सोसायटी स्पर्धेत प्रथम क्रमांक व्हाईट विंग्स, द्वितीय मोरेश्वर हेरिटेज व तृतीय क्रमांक प्रोग्रेसिव्ह ईव्ही या सोसायटीने पटकाविला. या तीनही स्पर्धांतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास अनुक्रमे १० हजार, तीन हजार व दोन हजार रुपये असे पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

### करंजाडे, उलवे नोड पनवेल महापालिकेत समाविष्ट करावे -लोकनेते रामशेठ ठाकूर



विविध प्रांतातील लोक उलवे नोडमध्ये वास्तव्यास आले आहेत. त्यांनी स्थानिकांसोबत एकरूप व्हावे, असे सांगून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर या वेळी म्हणाले की, या विभागाचा लोकसंख्येच्या अनुषंगाने विस्तार वाढला आहे. त्यामुळे करंजाडे व उलवे नोड पनवेल महापालिकेमध्ये समाविष्ट करावे, अशी आमची मागणी आहे. सायक्लोथॉन स्पर्धा यशस्वी होण्यासाठी उलवे सेना सामाजिक संस्था, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांनी परिश्रम घेतले. त्याचबरोबरीने स्वयंसेवकांची मेहनत महत्त्वपूर्ण ठरली, असेही त्यांनी नमूद केले.

*पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून या स्पर्धेचे आयोजन चांगला पर्याय आहे. उत्तम आयोजनातून झालेली ही स्पर्धा कौतुकास पात्र आहे. झाडे लावा, पाणी वाचवासोबतच जंक फूडचा वापर टाळा, हिरव्या भाज्या खा हा संदेश सर्वत्र पसरला पाहिजे आणि त्या अनुषंगाने सर्वांनी पर्यावरणाचे महत्त्व टिकवले पाहिजे.*

**-स्वाती पानसरे**, अभिनेत्री

---

## निवडक

### देवेंद्र फडणवीस यांना दुसऱ्यांदा कोरोनाची लागण

**मुंबई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून ही माहिती दिली. ते सध्या गृह विलगीकरणात आहेत. माझ्या संपर्कात जे कुणी आले असाल, त्यांनी आपली कोरोना चाचणी करून घ्यावी. सगळ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले आहे.

### पार्टी ठरली सुपर स्प्रेडर; शाहरूख कोरोना पॉझिटिव्ह

**मुंबई :** बॉलीवूड दिग्दर्शक करण जोहर याच्या ५०व्या वाढदिवसाची पार्टी सुपर स्प्रेडर इव्हेंट ठरली आहे, कारण जवळपास ५५ स्टार कलाकार पाहुण्यांना कोविड-१९ची लागण झाली आहे. आता या विळख्यात अभिनेता शाहरूख खानचेदेखील नाव समोर आले आहे, जो पार्टीत हजर होता.

## राज्यात १५ जूनपासून शाळा होणार सुरू

### शिक्षणमंत्र्यांची माहिती; कोरोनाविषयी एसओपी करणार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा कोरोनाने डोके वर काढले आहे. असे असले तरी नव्या शैक्षणिक वर्षातर्गंत येत्या १५ जूनपासून शाळा सुरू होणार आहेत. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी ही माहिती दिली.



ना. वर्षा गायकवाड म्हणाल्या, शाळा सुरू करणे गरजेचे आहे. या महिन्याच्या १५ तारखेला शाळा सुरू होतील. मागील दोन वर्षांचा अनुभव पाहता शाळा सुरू ठेवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये शाळा, शिक्षक, वही असे वातावरण हवे. मागील दोन वर्षांमध्ये दुसरीची मुले शाळेतच आलेली नाहीत. कोरोना वाढत आहे. त्यामुळे आम्हाला निश्चितच काही निर्णय घ्यावे लागतील. योग्य ती काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करू.

शाळा सुरू करण्यापूर्वी टास्क फोर्सशी आम्ही चर्चा करू आणि नंतरच मार्गदर्शक प्रणाली (एसओपी) जाहीर करू. सध्या सर्व मुलांची कोरोना चाचणी करण्याची गरज नाही. राज्य आणि केंद्र सरकारचे कोरोना प्रतिबंधक नियम वेगळे आहेत. त्यामुळे टास्क फोर्सशी चर्चा करूनच एसओपी जारी केली जाईल, असेही ना. गायकवाड म्हणाल्या.

### सलमान खानला जीवे मारण्याची धमकी

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता सलमान खान आणि त्याचे वडील लेखक सलीम खान यांना एका अज्ञात व्यक्तीकडून धमकीचे पत्र मिळाले आहे. या पत्रात त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सलीम खान सकाळी फिरण्यासाठी गेले होते. तिथे ते एका बाकावर बसले असताना त्यांना हे पत्र आढळून आले. या पत्रात त्यांना व त्यांचा मुलगा अभिनेता सलमान खानला धमकी देण्यात आली होती. 'सलमान खानचा सिद्धू मुसेवाला करून टाकू' असे या पत्रात लिहिण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसांत तक्रार देण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी भाजपची रणनीती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. सहाव्या जागेसंदर्भात रणनीती ठरवण्यासाठी भाजपचे निवडणूक प्रभारी तथा केंद्रीय मंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्षाची रविवारी (दि. ५) प्रदेश कार्यालयात बैठक झाली. कोरोना पॉझिटिव्ह असलेले विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीला ऑनलाइन उपस्थिती दर्शवली.

या बैठकीला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि सर्व प्रमुख नेते उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी भाजपच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणाले, आज आमचे केंद्रीय निरीक्षक आणि रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांच्या उपस्थितीत दोन बैठका झाल्या. यामध्ये केंद्रीय मंत्री आणि आमचे राज्यसभेचे उमेदवार पीयूष गोयलही उपस्थित होते. या वेळी झूम बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शक केले. या निवडणुकीचे पूर्वनियोजन आम्ही केले असून आमचा तिसरा उमेदवार जिंकणारच आणि शिवसेनेच्या संजयचा पराभव होणारच हे स्पष्ट आहे

राज्यसभा निवडणुकीत घोडेबाजाराच्या चर्चा रंगल्या आहेत. यावरून शेलार यांनी शिवसेनेवर जोरदार निशाणा साधला आहे. आमदारांना नजरकैदेत ठेवण्याचे पाप त्यांनी केले आहे. लोकशाहीत आजवर असे कधी झाले नव्हते. संजय राऊत यांचे बोलणे हे बालीशपणाचे आणि पोरकटपणाचे आहे. त्यांना कदाचित पराभव दिसत असेल, त्यामुळे ते असे बोलत आहे.

कोल्हापूरचे काँग्रेसचे काही आमदार सतेज पाटलांनी सांभाळले तर बरे होईल, असा टोलाही शेलार यांनी लगावला.

# ‘मविआ’कडून मुंबई, ठाण्यासारखी नवी मुंबईची लूट

## आमदार गणेश नाईक यांचा गंभीर आरोप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवलीत लूट माजविली आहे तशीच नवी मुंबई लुटायचा प्रयत्न महविकास आघाडी करत आहे. काही प्रमाणात त्यांनी नवी मुंबई लुटलीदेखील आहे. मात्र या अनावश्यक कामांच्या रुपात जो लुटीचा प्रयत्न व नवी मुंबईचे पर्यावरण उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांनी चालविला आहे, तो आम्ही हाणून पाडू. यासाठी आम्ही खंबीर आहोत. नवी मुंबईची लूट होऊ देणार नाही. प्रशासनाने हे प्रकल्प थांबविले नाहीत तर यापुढे लोकशाही पद्धतीने नाही तर उग्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा आ. गणेश नाईक यांनी ऐरोली ते कोपरी वाशीपर्यंत रविवारी (दि. ५) जन आक्रोश आंदोलन म्हणून काढलेल्या लाँग मार्चमध्ये दिला. यावेळी भाजपाचे नेते व माजी मंत्री आशीष शेलार हे देखील उपस्थित होते.

महाविकास आघाडीच्या नेत्यांमार्फत प्रशासकाला हाताशी धरत जो कारभार चालविला जात आहे तो नवी मुंबईकरांवर अन्याय आहे. आज हे शहर देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. नवी मुंबई करानी एकाच हातात सत्तेची सूत्रे दिल्याने हे साध्य झाले असल्याचे आमदार नाईक म्हणाले. कोविडमध्ये भाजपाचा प्रत्येक पदाधिकारी नागरिकांच्या सेवेत हजर होता. दुसरीकडे सत्ताधारी मात्र कोविडमध्येही सत्तेचे लोणी ओरबडत होते. झाडे तोडून आम्ही अनावश्यक उड्डाणपूल उभारू देणार नाही. दुसरीकडे वाशी सेक्टर १७ हे नवी मुंबईतील मुख्य व्यापाराचे ठिकाण आहे. त्या ठिकाणी बायोगॅस प्रकल्प आणला जात आहे. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागणार आहे. त्याऐवजी हा भूखंड पालिकेने व्यावसायिक वापरासाठी दिल्यास त्यातून पालिकेला उत्पन्न मिळेल असेही आमदार नाईक म्हणाले.

सीसीटीव्हीचे काम २७० कोटी रुपयांना दिले जाणार होते. आम्ही आवाज उठवताच ते १२० कोटी १२० कोटीचे काम २७० कोटी रुपयांना देण्यात आले. वाढीव कंत्राटातून १५० कोटीची लूट सत्ताधारी करणार होते.

यावेळी माजी मंत्री आशिष शेलार यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला. शेलार म्हणाले की, पर्यावरण दिनी आम्हाला झाडे वाचविण्यासाठी मोर्चा काढावा लागतो ही शोकांतिका आहे. पर्यावरण दिनानिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पूर्ण पान जाहिराती दिल्या आहेत. आदित्य ठाकरे म्हणाले की, ३० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट्य आहे, मात्र मी त्याला सांगेन की, अरे बाबा नवीन झाडे लावण्यासोबत आहेत टी झाडेदेखील टिकवा अशी खरपूस टीका शेलार यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर केली.

या उड्डाणपुलाची गरज काय? मी आयुक्तांना सांगेन की, तुम्ही प्रशासक आहात तुम्ही शासन नाही. प्रशासक हे धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही. एखाद्या कामासाठी पैसे खर्च केले जातात ते नवी मुंबईकरांच्या करांतून आलेले असतात. त्याचा वापर हा योग्यच व्हायला हवा असा टोलवा त्यानी लगावला. आदित्य ठाकरे यांनी एकीकडे झाडांसाठी मेट्रो ट्रेन थांबवली मग नवी मुंबईतील झाडे कशी तोडता? मला तर वाटते एखादा प्रकल्प कागदावर घ्यायचा घोषणा करायची मग विकासकांना बोलावून सेटलमेंट करत प्रकल्प रद्द करायचा हा धंदा पालकमंत्र्यांनी सुरू केल्याची टीका शेलार यांनी एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता केली.

**▮ आशिष शेलार यांचा जितेंद्र आव्हाडांना टोला**

*भाजपाने जनआक्रोश आंदोलन केले. त्याचवेळी राष्ट्रवादीने झाडांच्या संवर्धनासाठी चिपको आंदोलन केले. या वेळी मंत्री जितेंद्र आव्हाड उपस्थित होते. आशिष शेलार यांनी आव्हाडांना उद्देशून बोलताना चिपको आंदोलन येथे करता आणि तिथे शासनाला का चिकटता. नवी मुंबईकरांचा इतकाच कळवळा असेल तर सत्तेतून बाहेर पडा अशी टीका शेलार यांनी केली.*

**▮ ...अन्यथा जेलमध्ये जाल! प्रशासकांना इशारा**

*आयुक्त तथा प्रशासक यांनादेखील आमदार गणेश नाईक यांनी इशारा दिला. मंत्रालयातून अथवा ठाण्यातून फोन आला की प्रशासक लगेच कामे काढतात. गरज नसताना अनेक कामे केली जात आहेत असा गंभीर आरोप आमदार नाईक यांनी करत आपण प्रशासकांना एकच सांगेन की, आपण प्रशासक आहात. इतरांप्रमाणे आपणही जेलमध्ये जाल असा इशारा दिला.*

# आमदारांना घोडे म्हणण्याचे पाप फक्त गाढवच करू शकतो

## राज्यसभा निवडणुकीवरून किरीट सोमय्यांची शिवसेनेवर टीका

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विधानसभेतील अपक्ष आमदारांचे वजन चांगलेच वाढले आहे. तिसरा उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप या निवडणुकीत ‘घोडेबाजार’ करेल, असा आरोप शिवसेनेकडून वारंवार केला जात आहे. याबाबत भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांचा जबाब नोंदवण्यात यावा, अशी मागणी केली आहे. ते नाशिक येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. आमदारांना घोडे म्हणण्याचे पाप हे फक्त गाढवच करू शकतो, अशी टीकाही त्यांनी या वेळी केली.

राज्यसभा निवडणुकीत राज्यातून भाजपने तिसरा आणि शिवसेनेने दुसरा उमेदवार दिल्यामुळे चुरस निर्माण झाली आहे. यासाठी अपक्ष आमदारांशी जवळीक साधणे सुरू केले आहे. भाजप राज्यसभा निवडणुकीत ‘घोडेबाजार’ करेल, म्हणजेच अपक्ष आमदारांना पैशाचे आमिष दाखवून आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करेल, असा आरोप शिवसेना नेते करीत आहे.

निवडणुकीत भ्रष्टाचार होत असेल, तर तो करणारा, पाहणारा आणि होऊ देणारा हे सर्व जबाबदार आहेत. म्हणून आमची मागणी आहे की, मुख्यमंत्र्यांचा आणि त्यांच्या प्रवक्त्यांचा ताबडतोब जबाब नोंदवण्यात यावा. घोडेबाजार करणाऱ्यांवर कारवाई करायला हवी, असे भाजप नेते किरीट सोमय्या म्हणाले.



स्वतःच्या पक्षाचे, मित्रपक्षांचे आणि त्यांना समर्थन देणारे आमदार बिकाऊ आहेत, असे उद्धव ठाकरे आणि त्यांचे प्रवक्ते म्हणत आहेत. महाराष्ट्रात हे पहिल्यांदा घडत आहे. आमदारांना घोडे म्हणण्याचे पाप हे फक्त गाढवच करू शकतो. मग अप्रामाणिक आमदार कोण आहेत? असा सवाल किरीट सोमय्या यांनी केला. भाजप याचे कधीच समर्थन करणार नाही. याविरुद्ध चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे, पण हे जर खोटे असेल तर ते बोलणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, असेही सोमय्या म्हणाले.

# नवीन पनवेलमध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राजे शिवराय प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ५) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कॅन्सर सर्व्हाइवल डेचे औचित्य साधून टाटा कॅन्सर हॉस्पिटल खारघर यांच्या रक्तपेढीसोबत हा कॅम्प नवीन पनवेल सेक्टर ५ मधील वृंदावन बाबा मठ येथे झाला. या शिबिरामध्ये एकूण ९० रक्तदात्यांनी सहभाग दर्शविला.



ऐन उन्हाळ्याचे दिवस असतानादेखील प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी उत्साहाने काम करीत शिबिर यशस्वी केले. या शिबिरास डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी सदिच्छा भेट दिली. तसेच अनेक मान्यवर व्यक्तींनी भेट दिली.

या शिबिरांमध्ये सहभागी झालेल्या तसेच रक्तदान केलेल्या सर्व रक्तदात्यांचे राजे शिवराय प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने आभार मानण्यात आहे.

# श्री स्वामी समर्थ केंद्राचा आज वर्धापन दिन

**उरण : वार्ताहर**

उरण आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्राचा ४ था वर्धापन दिन सोमवारी (दि. ६) आयोजित करण्यात आला आहे.



सकाळी भूपाळी आरती, श्री स्वामी समर्थ महाराजांचा अभिषेक, श्री स्वामी सारामृत हवनयुक्त पाठ, नैवद्य आरती, दुपारी महाप्रसाद, श्री स्वामी समर्थ पालखी सोहळा होणार आहे. पालखी आनंदनगर येथून निघुन पुढे पालवी हॉस्पिटल, कामगार वसाहत, कामठा, एन. आय. हायस्कूल, स्वामी विवेकानंद चौक, गणपती चौक राजपाल नाका, पालवी हॉस्पिटल, आनंद नगर संस्कार केंद्र येथे सांगता समारोप होईल. सायंकाळी नैवेद्य आरती व कार्यक्रमाची सांगता होईल असे श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्रात दररोज आरती, अभिषेक व दर गुरुवारी आरती घेण्यात येते. त्याचप्रमाणे नागरिकांच्या समस्या, प्रश्न हे स्वामींच्या सेवेकरी यांच्याकडून मोलाचे मार्गदर्शन केले जाते.

# महिलेचे मॉर्फ केलेले फोटो व्हायरल करून बदनामी

## कळंबोली पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

इन्स्टा लोन ॲपवरून कर्ज घेऊन कर्जाचे हफ्ते भरले नाही, असे खोटे सांगून मार्फिग केलेले अश्लील फोटो व्हायरल केल्याने अज्ञात आरोपीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३६ वर्षीय पीडित महिला कळंबोली येथे राहत असून तिला एका मोबाइल क्रमांकावर मॉर्फिग केलेले अश्लील फोटो पाठवण्यात आले. तिच्या बहिणीने या नंबरवर फोन करून विचारले असता पीडित तरुणीने इन्स्टा लोन ॲपवरून कर्ज घेतलेले असल्याचे समोरील व्यक्तीने सांगितले व त्याबदल्यात तीन हजार तीनशे नव्वद रुपये पीडित तरुणीने पाठविले. त्यानंतर पुन्हा तीन हजार रुपये पाठवावे लागतील त्यानंतरच तुमचे लोन अकाउंट बंद होईल अन्यथा फोटो व मेसेज व्हायरल करेल अशी समोरच्या व्यक्तीने पीडित महिलेला धमकी दिली.

या वेळी त्यांनी समोरील व्यक्तीला पैसे दिले नाहीत. त्यामुळे संबंधित पीडित महिलेची मुलगी व त्यांच्या संपर्कातील एका महिलेचे फोटो मॉफिंग करून समोरील व्यक्तीने संपर्क लिस्टमध्ये मधील लोकांना व्हायरल केले. याबाबत महिलेला समजल्यानंतर तिने पोलिसांत तक्रार दाखल केली. दरम्यान, या प्रकरणी कळंबोली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# खून करून फरारी झालेला आरोपी ३१ वर्षानंतर जेरबंद

## माणगाव पोलिसांनी घेतले सातारा जिल्ह्यातून ताब्यात

### १७ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**माणगाव : प्रतिनिधी**

खून करुन फरारी झालेला आरोपी ३१ वर्षांनंतर माणगाव पोलिसांच्या ताब्यात आला आहे. नामदेव गौरु खैरकर (रा. कोस्ते बुद्रुक, ता. माणगाव, सध्या रा. कोरेगाव जि. सातारा) असे या आरोपीचे नाव आहे.

नामदेव खैरकर हा सुमारे ३१ वर्षांपूर्वी त्याची सख्खी भावजय हिच्यासोबत वाईट उद्देशाने संबंध ठेवण्याच्या हेतूने तिला त्रास देत होता. या महिलेने प्रतिसाद न दिल्याने आरोपीने तिला जीवे मारून तो फरारी झाला होता. त्याच्यावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होता.

आरोपी साताऱ्यातील कोरेगाव येथे राहत असल्याचे पोलिसांना कळाल्यानंतर उपविभागीय पोलीस प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी तपास पथक तयार करुन कोरेगाव येथे रवाना झाले. या ठिकाणी कोरगाव पोलीस ठाण्याच्या मदतीने सापळा रचून फरारी आरोपी नामदेव खैरकर यास पकडण्यात आले. व त्याला माणगाव पोलीस ठाणे येथे आणून त्याला न्यायालयात हजर केले असता १७ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २२

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. ऑटो क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** मारुती सुझुकी ***आ.*** एमएफआर ***इ.*** बजाज ऑटो ***ई.*** बाळकृष्ण इंडस्ट्रीज

**२. माहिती तंत्रज्ञान म्हणजे आयटी क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** इन्फोसिस ***आ.*** टीसीएस ***इ.*** कोफोर्ज ***ई.*** एल अँड टी इन्फोटेक

**३. मेटल क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** टाटा स्टील ***आ.*** रत्नमनी मेटल्स अँड ट्यूब ***इ.*** हिंदाल्को ***ई.*** जेएसपीएल

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


# कोरोनाच्या चौथ्या लाटेचे संकेत?

## देशात तीन महिन्यांमधील सर्वांत मोठी रुग्णवाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शनिवारी संपलेल्या २४ तासांत ४२५७ नवीन रुग्ण आढळले आहेत. या महिन्यात कोरोनाबाधितांची संख्या चार हजारांच्या पुढे गेली आहे. २ जून रोजीही देशात ४०४१ लोकांचा अहवाल पॉझिटिव्ह आला होता.

१५ कोरोनाबाधित रुग्णांच्या मृत्यूची शनिवारी झाली, तर २६१२ रुग्ण बरे झाले आहेत तसेच सध्या २२ हजार ६९१ कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार सुरू आहेत. देशात आतापर्यंत ४.३१ कोटी लोकांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यापैकी ४.२६ कोटी लोक बरे झाले असून ५.२४ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे.



केरळमध्ये कोरोना बाधितांची संख्या अधिक आहे. शनिवारी केरळमध्ये १४५६ नव्याने कोरोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत, तर सात रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या केरळमध्ये ७४२७ कोरोनाबाधितांवर उपचार सुरू आहेत. प्रत्येक १०० चाचण्यांमागे १० कोरोनाबाधित आढळून येत आहे. परिणामी केरळचा कोरोनाबाधिताचा दर ९.८७ टक्क्यांपर्यंत पोहचला आहे.

दरम्यान, ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया कोर्बे व्हॅक्स लसीला कोरोना बूस्टर डोस म्हणून मान्यता दिली आहे. १८ वर्षांवरील लोक ज्यांनी कोव्हिशिल्ड किंवा कोव्हॅक्सिनचे दोन्ही डोस घेतले आहेत ते आता आपत्कालीन परिस्थितीत बूस्टर डोस म्हणून कार्बे व्हॅक्स घेऊ शकतात.

**महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर**

***देशात कोरोना रुग्णांच्या बाबतीत अव्वल ठरलेल्या महाराष्ट्रात पुन्हा एकदा संसर्गाचा वेग वाढला आहे. राज्यात शनिवारी १३५७ नवीन रुग्ण आढळून आले आहेत, तर ५९५ रुग्ण बरे झाले असून एका कोरोनाबाधिताचा मृत्यू झाला आहे. सध्या ५८८८ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. कोरोनाचा वाढता प्रसार पाहता राज्यात पुन्हा एकदा मास्कसक्ती करण्यात येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.***



# कोरळवाडीत पर्यावरण दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

केंद्र सरकारच्या नेहरू युवा केंद्र रायगड-अलिबाग, मुंबई येथील कोकण कट्टा आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था मानधनवाडी पनवेल यांच्या वतीने पनवेल तालुक्यातील कोरळवाडीत जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या वेळी वनविभागाचे वनपाल हेमंत कारंडे कोकणकट्टाचे संस्थापक अजित पितळे व इतर कार्यकर्त्यांच्या हातून वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात कोकणकट्टाच्या माध्यमातून जाणाऱ्या माणुसकीच्या भिक्षाफेरीतून मिळालेले एक टन तांदूळ व दोनशे किलो डाळ पनवेल येथे ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने आदिवासी अनाथ व गरजू विद्यार्थ्यांसाठी बांधनवाडी येथे चालविल्या जाणाऱ्या बालग्राम प्रकल्पाकडे सुपूर्द करण्यात आले.

त्याचवेळी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण कार्यक्रम झाला. शेवग्याच्या ३५०० झाडांची मोफत रोपवाटिका करण्यासाठी शुभारंभ केला. ग्रामस्वराज्य समितीचे सामाजिक कार्यकर्ते अल्लाउद्दीन शेख यांनी त्याची जबाबदारी स्वीकारली. रायगडभूषण संतोष ठाकूर, कोकणकट्टा विलेपार्लेचे संस्थापक अजित पितळे, सुजित कदम, सुनील वणकुद्रे, जयवंत जोशी, कल्हे वन परिमंडळाचे वनपाल हेमंत कारंडे, वनरक्षक आप्पासाहेब घोंगडे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या मानसी पाटील, जीविका मोरे, राजेश रसाळ, तेजस चव्हाण, राजू पाटील, उदय गावंड, कैवल्य गजभिये, साहिल पाटील, अर्पिता कोळी, कोरलवाडी ग्रामस्थ प्रतिनिधी गुरुदास वाघे, महेंद्र वाघे व कोकण कट्टा पदाधिकारी उपस्थित होते.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. ६ जून २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
▪ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ▪ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
▪ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
▪ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
▪ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ▪ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
▪ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
▪ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम





## उपमहापौर सीताताई पाटील यांच्या माध्यमातून नेत्रतपासणी, चष्मेवाटप शिबिर, बेंच आणि डस्टबीन वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील यांच्या माध्यमातून मोफत नेत्रतपासणी, चष्मेवाटप शिबिर, तसेच सीताताई पाटील यांच्या नगरसेवक निधीमधून डस्टबीन आणि बेंचेसचे वाटप रविवारी (दि. ५) करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत चष्म्यांचे वाटप केले तसेच सीताताई पाटील यांनी राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून एस.एन.आय हॉस्पिटलच्या सौजन्याने मोफत नेत्र तपासणी आणि चष्मे वाटप शिबिराचे आयोजन खांदा कॉलनी येथील उपमहापौर सीताताई पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते.

या शिबिराचा लाभ १००हून अधिक नागरिकांनी घेतला. तसेच या वेळी उपमहापौर सीताताई पाटील यांच्या नगरसेवक निधीमधून परिसरातील सोसायट्यांना डस्टबीनचे आणि बेंचेसचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे खांदा कॉलनी शहर अध्यक्ष अभिषेक भोपी, भाजप नेते भीमराव पवार, ज्येष्ठ नेते सदानंद पाटील, मिथुन दर्गे, चेतन जाधव, संदीप डोंगरे, पवन वाघमारे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## चंद्रकला शेळके यांच्या नगरसेवक निधीतून गावदेवी मंदिर सुशोभीकरण, नागरिकांना बेंच, डस्टबीनची सुविधा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महापालिका क्षेत्रात विविध विकासकामांचा शुभारंभ कण्यात आला. त्यानुसार नगरसेविका चंद्रकला शशिकांत शेळके यांच्या नगरसेवक निधीतून अनेक विकासकामे आसुडगावामध्ये करण्यात आली आहे. त्यांचा शुभारंभ नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या हस्ते झाला.

नगरसेविका चंद्रकला शेळके यांच्या नगरसेवक निधीमधून आसुडगावातील गावदेवी मंदिराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. या कामाचे तसेच बेंचेसचे उद्घाटन आणि परिसरातील सोसायट्यांना डस्टबीन वाटप कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. ४) करण्यात आले होते.

या कामांचे उद्घाटन तसेच वाटप नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या यांच्यासह उपस्थितांच्या हस्ते झाले. या वेळी आसुडगावचे माजी सरपंच सीताराम हुद्दार, विजय भोपी, शशिकांत शेळके, वळवलीचे माजी सरपंच दिलीप पाटील, पांडुरंग म्हात्रे, हरिचंद्र म्हात्रे, हनुमंत पवार, बाबाजी पाटील, राजाराम कुमार, श्री. भोसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.







पनवेल : पंचायत समिती सदस्य राज पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, काका भगत, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत उपस्थित होते.

## खारघर येथील अनाथालयात भाजपकडून फळे, खाऊचे वाटप

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्ताने खारघरमधील अनाथालयामध्ये फळवाटप व खाऊवाटप करण्यात आले.

खारघर सेक्टर १२ मधील गिरिजाघर वेलफेअर असोसिएशनमधील अनाथालयाला भेट देऊन पनवेल महानगरपालिका प्रभाग ५चे नगरसेवक रामजी बेरा यांनी दरवर्षीप्रमाणे फळवाटप व खाऊवाटप हा उपक्रम राबविला.



या वेळी प्रभाग ४चे नगरसेवक प्रवीण पाटील, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, युवा मोर्चा उपाध्यक्ष शुभ पाटील व गिरीजाघर वेलफेअरचे व्यवस्थापक वसंत कुंजीर उपस्थित होते.



पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत आदी उपस्थित होते.



पनवेल : डॉ. संतोष पांढरे आणि मिलिंद पराडकर यांनी सुरू केलेल्या आधार मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल आणि ट्रॉमा केअर सेंटरचे उद्घाटन रविवारी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. स्नेहाश्री पांढरे, डॉ. अंकिता पराडकर आदी उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनी खारघर भाजपतर्फे वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी जगातील जवळपास दीडशेपेक्षा जास्त देश ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय जनता पक्ष खारघर मंडलच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन खारघरमधील सेक्टर १९च्या गार्डनमध्ये वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

वृक्षारोपण करताना मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी आम्ही वृक्षारोपण करून थांबणार नसून या सर्व झाडांचे संगोपन करण्याची शपथ घेतो. जेणेकरून भविष्यातील पर्यावरणाचे धोके टाळण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. सरचिटणीस दीपक शिंदे यांनी पृथ्वीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी



जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व सांगितले.

या वेळी भारतीय जनता पक्ष खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, वैद्यकीय विद्यार्थी आघाडी प्रदेश संयोजक विजय उजळंबे, शिक्षक सेलचे संयोजक प्रो. संदीप रेड्डी, भरत कोंढाळकर, गिरीश गुप्ता व शैलेंद्र त्रिपाठी या सर्वांनी वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला.

## राजिप सीईओ डॉ. किरण पाटील आणि गव्हाण ग्रामपंचायतीचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पर्यावरण संतुलनासाठी व रक्षणासाठी माझी वसुंधरा अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानात रायगड जिल्ह्याने उत्तम कामगिरी केली आहे. याबद्दल कोकण विभागात उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (राजिप सीईओ) डॉ. किरण पाटील व उत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायतीला राज्य सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा





अभियान संचालनालय यांच्यातर्फे रविवारी (दि. ५) गौरविण्यात आले.

पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वावर आधारित माझी वसुंधरा अभियान हे राज्यातील नागरी व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये व ग्रामपंचायतीमध्ये राबविणेत येत आहे. या अभियानात रायगड जिल्ह्यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्ह्यातील ५३० ग्रामपंचायतींनी या अभियानात नोंदणी करून सहभाग नोंदविला होता.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेचा सन्मान सोहळा नरीमन पाईट येथे झाला. या वेळी कोकण विभागात उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व उत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायतीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते.

## पनवेलमध्ये कुर्र्र्र्र्र नाट्यप्रयोग सादर; उत्तम प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्यांचे आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमधील अटल करंडक संयोजन समितीच्या वतीने शनिवारी (दि. ४) पनवेलमध्ये कुर्र्र्र्र्र हा नाट्यप्रयोग सादर झाला. या नाटकाला पनवेलकरांनी उत्तम प्रतिसाद दिला.



पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर झालेले हे नाटक लेखक प्रसाद खांडेकर दिग्दर्शित केले होते. यामध्ये प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, विशाखा सुभेदार, पंढरीनाथ कांबळे यांनी प्रमुख भूमिका बजावली.

या नाटकाला भाजपच्या ज्येष्ठनेत्या शकुंतला ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर, सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# मान्सूनची प्रतीक्षा

यंदा वरुणराजाचे आगमन लवकर होणार या हवामान खात्याच्या अंदाजाने सुखावलेला बळीराजासह सर्वसामान्य माणूस आता मात्र पावसाची चातकासारखी वाट पाहत आहे. यंदा प्रचंड उष्म्यामुळे लोक हैराण झाले आहेत. अगदी पशू-पक्षीही त्रस्त दिसत असून सर्वांचेच डोळे आकाशाकडे लागले आहेत, मात्र केरळात दाखल झालेल्या मोसमी पावसाचा पुढील प्रवास पोषक वातावरणाअभावी सध्या संथ गतीने सुरू आहे. यादरम्यान काही ठिकाणी पूर्वमोसमी सरी पडल्या असल्या तरी अनेक भाग अद्याप कोरडेठाकच आहेत.

**आपल्या देशात प्रामुख्याने पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा असे तीन ऋतू आहेत. यातील प्रत्येक ऋतूचे एक वैशिष्ट्य व महत्त्व असले तरी पावसाळ्याची उपयुक्तता अनन्यसाधारण आहे. पाणी म्हणजे जीवन मानले जाते आणि हे पाणी आपल्याला पावसाच्या रूपात मिळत असते. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडणाऱ्या पावसावर उर्वरित आठ महिन्यांचे नियोजन केले जाते. हल्ली वर्षाचे बाराही महिने कधीही आणि कुठेही अवकाळी पाऊस पडतो हा भाग वेगळा, पण पावसाळ्यातील पावसाचे बरसणे अवघ्या चराचरासाठी आवश्यक असते. यंदा मान्सून लवकर दस्तक देणार असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला होता. त्यानुसार बळीराजाने मशागतीची कामेही सुरू केली आहेत, मात्र केरळ आणि त्यानंतर काहीसा कर्नाटककडे सरकलेला पाऊस मध्येच रेंगाळला आहे. गेल्या काही वर्षांपासून कार्बन उत्सर्जन, प्रदूषण आणि अन्य कारणांमुळे ऋतूचक्रावर विपरित परिणाम झालेला आहे. त्यातून ग्लोबल वॉर्मिंगची समस्या निर्माण झाली आहे. तापमानवाढीचा हा फटका सर्वांनाच बसतोय. आपल्याकडेही तापमानाचा पारा ४०वर गेलेला असून राज्यातील विदर्भात उष्णतेचे विक्रम मोडले गेले आहेत. एवढेच नव्हे; तर हल्ली उष्णतेच्याही लाटा येऊ लागल्यात. कमालीच्या उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांना यंदा पाऊस लवकर दाखल होणार या आशेने हायसे वाटले होते, मात्र मान्सून मध्येच अडकल्याने 'येरे येरे पावसा' म्हणण्याची वेळ आली आहे. तसे पाहिले तर सध्या कडक उष्म्याबरोबरच ढगाळ वातावरणही पहावयास मिळत असून पावसाची चिन्हे दिसू लागलीत. त्यामुळे आता पाऊस पडेल असे वाटत असतानाच तो हुलकावणी देत आहे. गंभीर बाब म्हणजे प्रचंड उन्हाळ्यामुळे अनेक ठिकाणची पाणीपातळी आटली असून नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. जनावरांनाही पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवतेय. या पार्श्वभूमीवर कधी एकदा वरुणराजाला धरतीला शांत करतोय असे झाले आहे. या वर्षी देशात सरासरीच्या १०३ टक्के म्हणजे सर्वसामान्य पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यात चार टक्के कमी-अधिक होण्याची शक्यताही गृहीत धरण्यात आली आहे. १९७१ ते २०२० या कालावधीत भारतात पावसाची दीर्घकालीन सरासरी ८७ सेमी आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील बहुतांश भागांत चार महिन्यांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. पावसाचे आगमन अंदाज वर्तविल्याप्रमाणे झालेले नाही. आता त्याची सरासरी तरी खरी ठरेल का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. वेळेआधी नाही, पण नियमित ठरलेल्या वेळेत पाऊस पडो आणि त्याच्या वाटचालीने दिलासा मिळो, हीच प्रार्थना बळीराजासह सर्वजण करीत आहेत.**

# माथेरानच्या थरारक अश्वशर्यतीची परंपरा

**खबरबात**
संतोष पेरणे



घोड्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये दरवर्षी मे महिन्याच्या अखेरीस अश्वशर्यती आयोजित केल्या जातात. माथेरानच्या ऑलंपिया रेसकोर्सवरील हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुलात माथेरान युथ सोशल क्लब आणि माथेरान गिरीस्थान नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरानमध्ये रंगला अश्वशर्यतींचा थरार पाहायला मिळाला.

जवळपास ४५ वर्षांपूर्वी माथेरान युथ सोशल क्लबची स्थापना माथेरानचे माजी नगराध्यक्ष प्रदीप दिवाडकर यांनी केली. माथेरानच्या स्थानिक तरुणांना आणि माथेरानवर प्रेम करणाऱ्या रायडर्सला पर्वणी असते. स्थानिक आणि मुंबई पुण्याच्या अश्व रायडर्सला माथेरान येथे घोड्यांच्या विविध प्रकारच्या शर्यती/खेळ खेळता येतात. दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या शर्यती विना खंडित (कोरोना कालावधी सोडून २०२० आणि २०२१) माथेरान युथ सोशल क्लबच्या माध्यमातून आयोजित केल्या जातात सध्या MYSCची अध्यक्ष पदाची जबाबदारी दिवाडकर यांचे सुपुत्र प्रशाम दिवाडकर यांच्या माध्यमातून गेली काही वर्षे अश्वशर्यतींचा थरार आयोजित होतो.

दोन वर्षांच्या कोरोना महामारीमुळे २०२१ आणि २०२१ साली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले न्हवते. ह्या वर्षी २८ मे आणि २९ मे रोजी सालाबादप्रमाणे हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल म्हणजेच ओलीम्पिया रेसकोर्स येथे ही स्पर्धा मोठ्या दिमाखात पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर इ. ठिकाणावरून जवळपास २५ रायडर्स तसेच स्थानिक रायडर्स यांनी सहभाग घेतला होता. पहिल्या दिवशी लहान मुलांसाठी/मुलींसाठी धावण्याची शर्यत, तीन पायांची शर्यत, घोड्यावरील ट्रॉटिंग रेस, musical मग, galloping golf on horse back, carrying द बलून ऑन हॉर्स बॅक, महिलांसाठी संगीत खुर्ची इ स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तसेच दुसऱ्या दिवशी रविवारी दरवर्षी या स्पर्धेसाठी माथेरानच्या आसपासच्या आदिवासी वाडीतून सह कुटुंब सह परिवार आदिवासी बांधव-बघिणी तसेच लहान मूल-मुली स्पर्धा बघण्यासाठी न चुकता येत असतात. त्यामुळे माथेरानला तसेच मैदानाला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

दुसऱ्या दिवशीच्या स्पर्धेत आदिवासी मुलांसाठी धावण्याची शर्यत, लहान मूल/मुलींसाठी धावण्याची तसेच सॅक शर्यत, महिलांसाठी चमचा लिंबू शर्यत, घोड्यावरील रिले ट्रॉटिंग रेस, musical बॉल आणि बकेट, needle आणि thread स्पर्धा, chatty लिफ्टिंग ऑन हॉर्स बॅक,musical ball and bucket, tent pegging तसेच लोकल रायडर्स आणि टुरिष्ट रायडर्स यांची रस्सी खेच स्पर्धा इ. स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

माथेरान हे १०० टक्के पर्यटनावर अवलंबून असल्याने या स्पर्धेमुळे माथेरानच्या नागरिकांना तीन दिवसांत चांगल्या प्रमाणात व्यवसाय मिळाला. माथेरान नगरपरिषदेचा मानस राहिला आहे की खेळ...खेळातून पर्यटन आणि पर्यटनातून माथेरानकरांना रोजगार.

या स्पर्धेचा पर्यटकांनी, स्थानिक नागरिक तसेच आजूबाजूच्या आदिवासी बांधवांनी मनमुरादपणे आंनद घेतला तसेच या स्पर्धेचे यु ट्यूबद्वारे थेट प्रक्षेपणदेखील करण्यात आले होते. या स्पर्धेत लोकल चॅम्पियन ट्रॉफीचा मानकरी गोविंद झोरे तर उपविजेता यश शिंदे यांनी बाजी मारली तर टुरिष्ट चॅम्पियनशिपसाठी मनन सोनी आणि मुरतुझा मोरबीवाला यांच्यात समसमान गुण झाले त्यामध्ये टॉस उडविण्यात आला. २०२२चा टुरिष्ट चॅम्पियन मनन सोनी याला घोषित करण्यात आले, तर उपविजेता मुरतुझा मोरबीवाला याला घोषित करण्यात आले तसेच बेस्ट ड्रेस horseचा मान अनुक्रमे गणेश घावरे यांच्या माय लव या घोड्याने तसेच जय वीरा आणि शबाब कुरेशी यांच्या घोड्याने पटकावला. या वेळी सहभागी झालेल्या रायडर्स यांना ट्रॉफी मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

उन्हाळी पर्यटन हंगामात पर्यटक माथेरानमध्ये मोठ्या संख्येने यावेत यासाठी मे महिन्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये चित्तथरारक अश्वशर्यत. या अश्वशर्यतीत मुंबई, पुणे आणि माथेरानमधील घोडेस्वारांनी कसब दाखवताना अनेक शर्यतींमध्ये रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेत मुंबई, पुणे येथील घोडेस्वार आवर्जून सहभाग घेतात. निसर्गाच्या सानिध्यात, थंड हवेत ही स्पर्धा एक वेगळी छाप सोडत असते. काही पर्यटक तर ही स्पर्धा महत्त्वाची असते ती रसिक प्रेक्षकांची अनुभवण्यासाठी माथेरानमध्ये जिंकली येतात. माथेरान युथ सोशल क्लबचे अध्यक्ष प्रशाम दिवाडकर यांनी सांगितले की, पालिकेचे सहकार्य आणि स्थानिक तरुणांमुळे ही स्पर्धा अतिशय रंजक होते. दुसऱ्या दिवशी दुपारी सूर्यास्त होईपर्यंत अनेक शर्यती पार पडल्या. यामध्ये लहान मुलांसाठी हॉर्स ट्रॉटिंग रेस सर्व प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. त्यानंतर घोड्यावरील वेगवेगळ्या रोमहर्षक शर्यती झाल्या. या शर्यतीमध्ये टेंट पेगिंग, बॉल अँड बकेट मनोरंजक ठरल्या. यामध्ये काही घोडेस्वारांना दोन सेकंदाच्या फरकाने हार मानवी लागली. लहान मुले, महिला आणि आदिवासी बांधव यांच्यासाठी सुद्धा स्पर्धांचे आयोजन केले होते. या अश्व शर्यतीत आनंद बिरामाणे यांच्या मालकीचा बोल्ट नावाचा घोडा चॅम्पियन ठरला तर स्थानिक पातळीवर गोविंद झोरे तर पर्यटक घोडेस्वार म्हणून मन्नन सोनी हे चॅम्पियन घोडेस्वार ठरले. विजेत्यांना बक्षिसे देऊन त्यांना गौरवण्यात आले. मुंबई येथील करण संघवी यांच्या परिवाराकडून विजेत्यांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे या शर्यती पाहण्यासाठी विविध ठिकाणाहून सहा हजारांपेक्षा जास्त प्रेक्षक उपस्थित होते.

माथेरान नगरपालिकेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे शिंदे, माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, MYSCचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष प्रदीप दिवाडकर, महालक्ष्मी पोनी क्लबच्या अध्यक्षा नीता निहलानी, अश्वपाल संघटनेच्या अध्यक्ष आशा कदम, माजी उनगराध्यक्षा हिरावती सकपाळ, माजी नगरसेवक संदीप शिंदे, वनसमितीचे उपाध्यक्ष लक्ष्मण कदम, युवा सेना अध्यक्ष निमेश मेहता, सचिव श्रेयस गायकवाड, आरपीआय अध्यक्ष अनिल गायकवाड इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक प्रसाद सावंत यांनी केले, तर स्कॉररची भूमिका रितिका प्रशाम दिवाडकर आणि प्राची सकपाळ यांनी पार पाडली. आयोजक आणि खजिनदारची जबाबदारी शर्मिला प्रदीप दिवाडकर यांनी तर स्पर्धेत जजची भूमिका संदीप शिंदे, किरण जाधव, बाळा शिंदे, पुष्कराज दिवाडकर, किरण पेमारे, गणेश घावरे, अनिस शेख, आलम मुजावर, हैदर शेख, इरफान शेख, प्रकाश सुतार, आजमुद्दीन नालबंद, आरिफ पन्हाळकर, इ. मान्यवरांनी पार पाडली. तसेच मैदान देखभाल आणि नियोजनची जबाबदारी जयराम, धोंडू, राजू सावंत, विकास पार्टे, विजय चव्हाण, अर्जुन पारधी, भोऱ्या यांच्या मेहनतीने पार पाडली.

## बदलते तंत्रज्ञान

# आता घराच्या भिंतीच बनतील सिनेमा स्क्रीन

BenQने भारतात आपला नवीन पोर्टेबल प्रोजेक्टर लाँच केला असून हे एक वायरलेस डिव्हाइस आहे. ज्याचे नाव BenQ GS50 आहे. या उपकरणाच्या मदतीने तुम्ही घराच्या कोणत्याही भिंतीचा सिनेमा स्क्रीन म्हणून वापर करू शकता. सामान्य टीव्हीच्या तुलनेत तुम्ही त्याची स्क्रीन आकारमान वाढवू शकता. कंपनीचा दावा आहे की, ते १०० इंचांपर्यंतचे टीव्ही बनवू शकतात. हे डिव्हाइस केवळ एक चांगला अनुभव देईल असे नाही तर एकदा लॅपटॉपशी कनेक्ट केल्यानंतर, डिव्हाइसवरील कोणताही कन्टेन्ट स्क्रीनवर Stream करता येईल. यात १०८० पिक्सेल फुल एचडी रिझोल्यूशन Content आहे.



BenQ GS 50च्या लुकबद्दल बोलायचे झाले तर, ते खूप आकर्षक आहे आणि याला बर्याच पोर्ट्सऐवजी स्वच्छ बॉडी मिळते. Amazon वर उपलब्ध, तुम्ही हे उत्पादन ७९,९९० मध्ये खरेदी करू शकता. हे डिव्हाईस ५००० ANSI लुमेनच्या ब्राइटनेससह BenQ GS50 प्रोजेक्टर डिस्प्लेसह येते. त्याच्या लाईफबद्दल बोलायचे झाले तर, ते दिवसाचे ८ तास जरी चालविले तरी देखील १० वर्षे आरामात वापरता येते.


BenQ GS 50 स्मार्ट प्रोजेक्टर स्पोर्ट्समध्ये ऑल इन वन डिझाईन वापरण्यात आले आहे. हा कॉम्पॅक्ट प्रोजेक्टर आहे. यात IPX स्पेस रेझिस्टन्सची सुविधा आहे. यात २.३ फूट ड्रॉप संरक्षण आहे. या प्रोजेक्टरच्या मदतीने युजर्स १०० इंचांपर्यंतचा डिस्प्ले सहज तयार करू शकतात. या वायरलेस प्रोजेक्टरमध्ये २.१ चॅनल ब्लूटूथ स्पीकर आहेत, जे अतिरिक्त बास म्हणूनही काम करतात. या प्रोजेक्टरवर ३.५ mm जॅकच्या मदतीने एक्सटर्नल स्पीकर लावले जाऊ शकतात. ज्यामुळे युजर्सना आणखी चांगली Sound Quality मिळू शकते.

Android TV BenQ GS50 स्मार्ट प्रोजेक्टर इनबिल्ट फीचर्ससह येतो. यात २.५ तासांचा बॅटरी बॅकअप आहे. तसेच, कनेक्टिव्हिटीच्या बाबतीत, यात HDMI, USB प्रकार, मोबाइल मिररिंग आणि कास्टिंगचा पर्यायदेखील आहे. त्याचा इंटरफेस Android 10 TV सारखा दिसू शकतो.

# शिवरायांचे आठवावे रूप। आठवावा प्रताप।।

**निमित्त**

शिवराज्याभिषेक दरबार, जुलिअन तारीख ६ जून १६७४. या दिवशी पहिले अष्टप्रधान मंडळ स्थापण्यात आले.



छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या शिवराज्याभिषेकाची तयारी कितीतरी महिने अगोदर सुरू झाली होती. राज्याभिषेकासाठी निश्चित अशी कोणती परंपरा नव्हती. प्राचीन परंपरा आणि आणि राजनीतीवरील ग्रंथातून काही विद्रवानांनी प्रथा-परंपरांचा अभ्यास केला. शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून ब्राह्मणांना आमंत्रण देण्यात आले होते. लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते. चार महिन्यांसाठी त्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. रोज त्यांना मिष्ठान्नाचे जेवण असे. सरदार राज्यातील श्रीमंत गणमान्य व्यक्ती. दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच या सोहळ्याला उपस्थित झाले होते. प्रत्येक दिवशी एका धार्मिक विधीत आणि संस्कारात शिवाजी महाराज गढून गेले होते. राजे शिवाजी यांनी सर्वप्रथम आपली आई जिजाबाईंना नमस्कार केला. त्यांचे आशीर्वाद घेतले.

यानंतर महाराजांनी विविध मंदिरांत जाऊन देवदर्शन केले. देवके दर्शन घेतले, पूजा केली आणि ते रायगडाला १२ मे १६७४ला परत आले. तुळजापूरला भवानी मातेच्या दर्शनासाठी त्यांना जाणे शक्य नव्हते. म्हणून चार दिवसांनी ते प्रतापगडवरील प्रतिष्ठापना केलेल्या भवानीमाता देवीच्या दर्शनासाठी गेले. त्यावेळी सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली. २१ मेला पुन्हा रागयगडावर ते धार्मिक विधीत गुंतून गेले. महाराजांनी २८ मेला प्रायश्चित्त केले जानवे परिधान केले. दुसऱ्या दिवशी दोन राण्यांबरोबर पुन्हा विवाह विधी केला. त्यावेळी गागाभट्टांना ७००० होन तर इतर सर्व ब्राह्मणांना मिळून १७००० होन दक्षिणा दिली.

दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे आणि लोखंड अशा सात धातूंनी वेगवेगळी तुला झाली. याशिवाय वस्त्र, कापूर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, गुळ, फळे इत्यादींच्या तुला झाल्या.

६ जून १६७४ला राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरू झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. या वेळी शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचावर शिवाजी महाराज बसले, शेजारी उपरण्याला साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचावर, तर बालसंभाजीराजे थोडेसे मागे बसले होते. अष्टप्रधानांतील आठ प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर ते जलकुंभांनी शिवाजीमहाराजांबर अभिषेक केला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणि आसमंतात विविध सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला. 'शिवराज की जय' शिवराज की जय'च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीचे फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून उच्चार केला.

## आरोग्य प्रहर

# लेन्स न काढता झोपणे ठरू शकते धोकादायक!

कॉन्टॅक्ट लेन्स प्रत्येकजण वेगवेगळ्या कारणांसाठी वापरतात. यापैकी बहुतेक संख्या अशा लोकांची आहे ज्यांना दृष्टीची समस्या आहे आणि त्यांना चष्मा घालायचा नाही. त्याचबरोबर काही तरुण असेही आहेत जे डोळ्यांचा रंग बदलण्यासाठी किंवा डोळे अधिक आकर्षक दिसण्यासाठी कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर करतात. तुम्ही या लेन्स कोणत्याही कारणास्तव वापरता,जर तुम्ही कॉन्टॅक्ट लेन्स वापरत असाल तर तुम्ही झोपण्यापूर्वी लेन्स काढून टाका.लेन्स लावून झोपल्याने डोळ्यांना त्रास होऊ शकतो. झोपण्यापूर्वी कॉँटॅक्ट लेन्स काढायलाच हवे, जाणून घ्या का?



डॉक्टर रात्री झोपण्यापूर्वी लेन्स काढून टाकण्याचा आणि कॉन्टॅक्ट लेन्स सोल्युशनमध्ये टाकण्याचा सल्ला देतात. डॉक्टरांचा या सल्ल्याकडे दुर्लक्ष करू नये.कारण असे न केल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.रात्री झोपण्यापूर्वी कॉन्टॅक्ट लेन्स काढल्या नाहीत तर तुम्हाला कोणत्या समस्या होऊ शकतात चला जाणून घेऊ या.

**कॉर्नियल सूज** – एका संशोधनात सांगितले की, जे लोक रात्री लेन्स न काढता झोपतात, त्यांच्या डोळ्यांच्या कॉर्नियामध्ये सूज होण्याची समस्या उदभवते. हे घडते कारण कॉर्नियाला ऑक्सिजनची आवश्यकता असते. दिवसा जेव्हा तुम्ही लेन्स लावता तेव्हा कॉर्नियाला कमी ऑक्सिजन मिळतो आणि जेव्हा तुम्ही रात्री लेन्स न काढता झोपायला जाता तेव्हा कॉर्नियाला ऑक्सिजन मिळण्याचे प्रमाण आणखी कमी होते. त्यामुळे कॉर्निया सुजतो. ही सूज फारशी नसते आणि सहसा तुम्हाला कोणताही परिणाम दिसत नाही. परंतु या सूजमुळे पृष्ठभागावरील पेशींमध्ये अंतर निर्माण होते. यामुळे तुमच्या डोळ्यांमध्ये बॅक्टेरिया वाढण्यास जागा मिळते, ज्यामुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो.

**डोळ्याला संसर्ग होतो** – जेव्हा तुम्ही लेन्स न काढता झोपता तेव्हा तुमच्या डोळ्यांना संसर्ग होण्याची शक्यता ६ ते ८ पटीने वाढते. म्हणजेच, एक तर तुमच्या डोळ्यांमध्ये सूज आल्यामुळे, रिक्त जागा तयार होते आणि नंतर डोळ्यांमध्ये बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता वाढल्याने संसर्गाचा धोका आणखी वाढतो.



**क्लिक...क्लिक...!** **मुरुड : येथील समुद्रकिनारी रविवारी पर्यटकांनी गर्दी केली होती. मोठ्या प्रमाणात पर्यटक आपली वाहने घेऊन आल्याने काही ठिकाणी वाहतूक कोंडीदेखील झाली होती.** (छाया : संजय करडे)

# माणगावमधील रिक्त पदांचे ग्रहण सुटेना!

## कामासाठी तालुका ठिकाणी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय

**माणगाव : प्रतिनिधी**

नागरिकांसाठी लोककल्याणाच्या योजना राबविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. मात्र या विविध योजना व सरकारी कामकाज चालविणारी यंत्रणा सक्षम नसेल तर त्या योजना तळागाळात कशा पोहोचणार? असा सवाल नागरीकांतून उपस्थित होत आहे.

माणगाव तालुक्यात विविध खात्यातील कार्यालयात अनेक रिक्तपदे असून या रिक्तपदांचा अतिरिक्त कारभार पर्यायाने त्याच कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांवर सोपवून अधिकारी मोकळे होतात. मात्र या रिक्तपदांमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. आपल्या कामासाठी नागरिक शासन दरबारी खेटे मारत असतात. माणगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे श्रीवर्धन व म्हसळा तालुक्याचे प्रभारी गट अधिकाऱ्याचा पदभार असल्याने 'एक अधिकारी तोही तीन तालुक्याचा प्रभारी' अशी स्थिती झाली आहे. तर तालुक्यातील पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी ही ग्रामपातळीवरील विकासाचे महत्त्वाची पदे असून गावाचा गाडा चालविणारी यंत्रणा आहेत. तीही पदे रिक्त आहेत. याशिवाय शासनाच्या विविध कार्यालयातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने माणगाव तालुक्यात रिक्तपदांचा बोजवारा उडाला आहे.

माणगाव तालुक्यात तालुका कृषी अधिकारी हे पद १३ ऑगस्ट २०२२ पासून रिक्त आहेत. त्या पदावर तालुका कृषी अधिकारी वर्ग दोनचा कारभार म्हणून प्रभारी तालुका कृषी अधिकाऱ्याची नियुक्ती आहे. कनिष्ठ कृषी अधिकारी वर्ग दोनची दोन पदे रिक्त आहेत. कृषी सहाय्यक पाच पदे, शिपाई दोन पदे, सहाय्यक अधीक्षक एक पद, कनिष्ठ लिपिक एक पद तर माणगाव उपविभागीय कार्यालय अंतर्गत तलाठी पाच पदे रिक्त आहेत. शिपाई रोहा, माणगाव, तळा, सुधागड या तालुक्यातील सहा पदे रिक्त आहेत, कोतवाल चार पदे रिक्त तर माणगाव तालुक्यात पोलीस पाटलांची १०१ पदे रिक्त आहेत. माणगाव तहसील कार्यालयात महसूल सहाय्यक सहा पदे, मंडळ अधिकारी एक पद, शिपाई एक पद, स्वच्छक एक पद, कोतवाल सहा पदे, तलाठी पाच पदे ही पदे रिक्त आहेत. पं.स.मध्ये सहाय्यक गट विकास अधिकारी एक पद, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा एक पद, वरिष्ठ सहाय्यक पंचायत समिती दोन पदे, कनिष्ठ सहाय्यक सात पदे, वाहन चालक आठ पदे, शिपाई दहा पदे, विस्तार अधिकारी सांख्यिकी एक पद, सहाय्यक लेखाधिकारी एक पद, कनिष्ठ लेखाधिकारी एक पद, ग्रामसेवक १२ पदे रिक्त आहेत.

### लोकाभिमुख प्रशासन एक प्रश्नचिन्ह

**माणगाव तालुक्यातील पोलीस ठाणे, दुय्यम निबंधक, भूमी अभिलेख याही कार्यालयात अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत. ही पदे शासन कधी भरणार असा सवाल नागरीकांतून उपस्थित होत आहे. माणगाव तालुक्यात विविध कामासाठी ग्रामीण भागातून व अन्य ठिकाणाहून नागरिक आपली कामे करण्यासाठी येत असतात. या रिक्तपदाच्या कर्मचाऱ्यांची कामे त्याच कार्यालयातील अन्य कर्मचाऱ्यांवर सोपवली जात आहेत. त्या कर्मचाऱ्यांवर आपल्याकडील असणारी कामे अधिक अतिरिक्त येणारी कामे वाढत असल्याने या कर्मचाऱ्यांवर कामाचा बोजा वाढत आहे. शासनाचे विविध योजना राबविणारी यंत्रणाच कुचकामी असेल तर लोकाभिमुख प्रशासन कसे चालणार असा सवाल उपस्थित होत आहे.**

# वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेने ट्रकचालकाचे वाचले प्राण

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव वाहतून पोलिसांच्या सतर्कतेमुळे ट्रक चालकाचे प्राण वाचले आहेत. याबद्दल नागरिकांकडून वाहतूक पोलिसांचे कौतुक होत आहे.

अधिक वृत्त असे, ४ जून रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास एक ट्रक (नंबर जीजे १३ डब्ल्यू ०१०८ हा मुंबई-गोवा महामार्गावरुन महाड बाजूकडून मुंबईच्या दिशेने जात होता. माणगावनजीक जुने माणगाव तीनबत्ती नाका येथे ट्रक आला असता ट्रकचालकाला गाडी चालवत असताना अचानक अस्वस्थ वाटू लागले. चक्कर येऊन ट्रक मध्येच तो बेशुद्ध पडला. तर ट्रक रोडच्या बाजूला जाऊन थांबला. त्यामुळे मोठा अनर्थ होण्यापासून टळला.

या वेळी त्या परिसरात असणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी ड्युटीवर असणाऱ्या वाहतूक पोलिसांना फोन करून माहिती दिली. माणगाव वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार स.फौ. अनिल महाडिक, पो.कॉ.लालासाहेब वाघमोडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन ट्रक चालकाला माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. योग्य वेळी उपचारासाठी दाखल करून पोलिसांनी आपले कर्तव्यतत्परता दाखवून दिली. त्याची विचारपूस करून त्याच्या मालकाला फोनवरून सदर घटने बाबत माहिती दिली.

# तिवरे येथे पर्यावरण दिनानिमित्त एक हजार झाडे लावण्याचा संकल्प

**कर्जत : प्रतिनिधी**

वाढते तापमान बदलते हवामान आणि औद्योगिकरणामुळे वाढत असलेले प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चाललेला आहे. पर्यावरणातील समतोल राखण्यासाठी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण म्हणून दिन साजरा केला जात आहे. या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट जागृती प्रकल्प तिवरे येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या वेळी एक हजार झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला.

या वेळी लाईट ऑफ लाईट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश दासवाणी, कमल दमानिया, सहाय्यक प्रकल्प अधिकारी गौतम कनोजे यांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले. याप्रसंगी कृषी अधिकारी कन्हैया सोमणे, विद्यानंद ओव्हाळ, राजेश भोईर, नीता बडेकर, तानाजी मिणमिणे, सुरज आगिवले, दशरथ नाईक, श्रुतिका पाटील, भगवान ठाकरे, महेंद्र श्रीखंडे आदी उपस्थित होते. ट्रस्टच्या जागृती प्रकल्पांतर्गत गेल्या ११ वर्षापासून पर्यावरण संवर्धन कार्यक्रम होत आहेत. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जागतिक पर्यावरण दिनी एका महिन्यांमध्ये एक हजार झाडांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.



(छाया : संतोष परणे)

### नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

कर्जत तिवरे येथील जागृती प्रकल्पाच्या मोकळ्या जागेमध्ये ही झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. या झाडांमध्ये पेरू, काजू, चिंच, जांभूळ, आवळा, सीताफळ, गुलमोहर, काशीद, आकाशिया आणि आपटा या प्रकारची झाडे लावण्यात येणार आहेत. त्यांची सुरुवात जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने करण्यात आली. जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने 'एक झाड लावा आणि पर्यावरणाला हातभार लावा' ही मोहीम सुरू केली असून १५ जुलैपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. या मोहिमेत आपण सर्व जण सहभागी होऊया असे आवाहन जागृती प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# धाटाव येथे पर्यावरण दिन उत्साहात साजरा

## डीएमसी कंपनीकडून विविध उपक्रम

**कर्जत : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वाढते हवेचे पाण्याचे प्रदुषण त्या मुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास या मुळे मानवी दैनंदिन जीवनावर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी आपण सर्व मिळून पर्यावरण जतन व संवर्धन करण्यासाठी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सर्व कंपनी व सरकारी निमसरकारी कार्यालयात पर्यावरण संवर्धन संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. पर्यावरण दिनाचा एक भाग म्हणून डीएमसी कंपनी धाटाव येथे पर्यावरण दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.



सर्व प्रथम कंपनीचे सेफ्टी मॅनेजर अरुण माने यांनी कर्मचारी व कामगार, कंत्राटी कामगार यांना कंपनीचे उपाध्यक्ष संभाजीराव जाधव व अधिकारी सुरेश ताम्हणकर यांच्या उपस्थितीत सर्वांना पर्यावरण सुरक्षा व संवर्धनाची शपथ दिली. त्यानंतर कर्मचारी, कामगार, कंत्राटी कामगार यांनी मिळून व्यवस्थापकीय ऑफिस ते प्लॅन्ट ते कॉलनी अशी कंपनीच्या परिसरात पर्यावरण सुरक्षाचे फलक घेऊन घोषणा देत पर्यावरण सुरक्षा दिंडी काढण्यात आली. तसेच कंपनीच्या आवारात स्टाफ व कामगारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर दुपारी कंपनीतील कामगार व कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी पर्यावरण संबधित चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेला मुलांनी सुंदर चित्रे काढून चांगला प्रतिसाद दिला. ही चित्रे सर्वांना पाहण्यासाठी कंपनीच्या मेस रुममध्ये ठेवण्यात आली असून त्यातून चार विजेते नंबर काढून बक्षिस देण्याचा कार्यक्रम करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्सनल डिपार्टमेंटचे राकेश खांडेकर, अनिकेत पाटील, रायसिंग खांडेकर व सेफ्टी डिपार्टमेंटचे सागर जाधव, क्यूए डिपार्टमेंटच्या प्राची म्हात्रे, संदीप संकपाळ यांनी विशेष मेहनत घेतली.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन सेफ्टी मॅनेजर अरुण माने यांनी कंपनीचे उपाध्यक्ष संभाजीराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण दिन पार पडला. तसेच सर्व स्टाफ व कामगार व कंत्राटी कामगारांनी सहभाग घेऊन पर्यावरण दिन कंपनीत उत्साहात साजरा करण्यात आला.

# कर्जतच्या टेकडीवर वृक्षारोपण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एक छोटीशी टेकडी आहे. या टेकडीवर सकाळी आणि संध्याकाळी बरेचशे नागरिक फिरायला जात असतात. जागतिक पर्यावरण दिनाचे आदित्य साधून मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांनी वृक्षारोपण केले.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या टेकडीवर तहसील कार्यालयासह दोन ते तीन अन्य कार्यालय आहेत. तसेच कर्जत शहराला पाणीपुरवठा करणारी पाण्याची टाकी याचठिकाणी आह. सकाळी फार मोठ्या प्रमाणात नागरिक मॉर्निंग वाकला जात असतात. पण हे लोक फक्त मॉर्निंग वॉक न करता वृक्ष मित्रांनी लावलेली झाडे जगविण्यासाठी या झाडांना पाणी घालण्याचे काम करतात. मॉर्निंग वॉकला जाण्या मध्ये कर्जतच्या प्रथम नागरिक नगराध्यक्ष सुवर्णा जोशी त्यांच्या मैत्रिणी अन्य पुरुष, महिलांचा यांचा समावेश असतो.



आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कर्जतच्या टेकडीवर नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, डॉ.शर्वरी कुळकर्णी, शिल्पा दगडे, दिलीप कदम, डॉ आशुतोष कुळकर्णी, भाई मनोरे, महेश वैद्य, संदीप जोशी, विकास चित्ते, मोतीलाल ओसवाल, प्रशांत परदेशी, विहंग परब, मनोज वरसोलिकर, दिपक भालेराव आदिंनी वृक्षारोपण केले आणि खऱ्या अर्थाने जागतिक पर्यावरण दिन साजरा केला.

# म्हसळा आयटीआयमध्ये प्राचार्यांसह अनेक पदे रिक्त

## शैक्षणिक दर्जा खालावतोय!

**म्हसळा : प्रतिनिधी**

आयटीआय कोर्स विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देतात आणि लवकरात लवकर काम मिळविणे सोपे होते, या उद्देशाने पालकांनी मुले शिक्षणासाठी पाठविली. मात्र म्हसळामध्ये प्राचार्य, इन्स्ट्रक्टरची अनेक पदे रिक्त असल्याने विद्यार्थी नक्की काय शिकतात, यावर पालक नाराज आहेत.

म्हसळा आय.टी.आय.मध्ये वीजतंत्री, यांत्रिक इलेक्ट्रॉनिक, जोडारी, संधाता, नळ कारागीर, शिवण व कर्तन हे ट्रेड आहेत. या सहा ट्रेडसाठी १३२ विद्यार्थाना मंजूरी असताना केवळ ९६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राचार्य आणि इन्स्ट्रक्टर यांचा संपर्क कमी असल्यामुळे विद्यार्थी संख्या कमी झाल्याची तक्रार आहे.



म्हसळा आय.टी.आय.मध्ये प्राचार्य, शिल्प निर्देशक वीज तंत्री, शिल्प निर्देशक ओडारी, शिल्प निदेशक संधाता, शिल्प निर्देशक नळ कारागीर ही तांत्रिक पदे रिक्त आहेत. कार्यालयीन व्यवस्थापनातील कनिष्ठ लिपीक एक, सहा.भांडारपाल एक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी दोन अशी पदे रिक्त आहे. कार्यालयीन मंजूरपदांपैकी ६४ टक्के पदे रिक्त आहेत. तांत्रिक व कार्यालयीन कामकाजासाठी १४ पदे मंजूर असून केवळ पाच पदे कार्यरत आहेत. श्रीवर्धन टेक्नीकल हायस्कूलच्या प्राचार्याकडे, म्हसळा, श्रीवर्धन आणि माणगाव आयटीआय, असे तीन प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यभार असल्याने वीज बील थकीत राहते. या मुळे म्हसळा आयटीआयचे पॉवर कट केल्याच्या घटना घडतात.

**श्रीवर्धन -म्हसळा तालुक्याचा पर्यटन, व्यावसायीक आणि औद्योगिक विकास सुरु असताना ट्रेड सहा आणि केवळ दोन इन्स्ट्रक्टर (शिल्प निर्देशक) हे चुकीचे आहे. भविष्यात मोटर व्हेईकल मॅकॅनिक, मरीन फिटर, डीझेल मॅकॅनिक, को.पा.(** कॉम्प्युटर ऑपरेटर प्रोग्रॅमिंग असिस्टंट) **या पैकी ट्रेड सुरु होणे आवश्यक आहे.**

**-निलेश मांदाडकर, सरपंच ग्रामपंचायत,खरसई**

**म्हसळा आय.टी.आय.मध्ये सहा ट्रेड कार्यरत असताना केवळ दोन ट्रेडना शिक्षक असणे, १३२ विद्यार्थाना मंजूरी असताना केवळ ९६ विद्यार्थी प्रवेश घेणे या आयटीआय आस्थापनेतील उणिवा आहेत. प्राचार्याचा स्थानिक लोक प्रतिनिधी, ग्रामस्थांजवळ संवाद असता तर सर्व ट्रेड भरभरून चालतील.**

**-रियाज फकीह, माजी सरपंच, वरवठणे.**

# मध्ययुगीन मूर्तींच्या शोधामुळे कर्जतचे प्राचीनत्व अधोरेखित

## देऊळवाडीतील मूर्ती घेताहेत लक्ष वेधून; संवर्धनाची मागणी

**कर्जत : विजय मांडे**

कर्जत तालुक्यात कोथळीगड, भीमगड, कोंढाणे लेणी, आंबिवली लेणी, होळकर तलाव अशा एक ना अनेक वास्तू प्राचीन इतिहासाची साक्ष देत उभ्या आहेत. इतिहास अभ्यासक आणि संशोधक असलेले कर्जतचे सागर सुर्वे यांनी आता आपल्या संशोधनाने यात अधिक भर घातली आहे. तालुक्यातील देऊळवाडी येथील मध्ययुगीन मूर्तींचा शोध घेऊन कर्जतच्या प्राचीनत्वाच्या खुणा अधिकच अधोरेखित केल्या आहेत.

कर्जतला मोठा प्राचीन इतिहास आहे. मात्र मागील कित्येक वर्षे येथे असलेल्या पुरावशेषांवर फारसा सविस्तर अभ्यास झालाच नाही. त्यामुळे कर्जतचे प्राचीनत्व लोकांपर्यंत पोहचले नाही. परंतु आता मात्र त्यावर इतिहास अभ्यासक व संशोधक सागर सुर्वे यावर सखोल अभ्यास करून ते प्रकाशित करत आहेत. त्यामुळे कर्जतची ओळख आज जरी फार्महाऊस सिटी म्हणून होत असली तरी कधी एकेकाळी कर्जतची खरी ओळख प्राचीन म्हणून होती हे आता हळू-हळू नव्याने समोर येत आहे.

अकरावे शतक म्हणजे उत्तर कोकणातील शिलाहारांच्या राजसत्तेचा काळ होय. याच काळात अंबरनाथमध्ये वालधुनी नदीच्या काठावर भव्य असे शिवालय उभे राहिले. त्याच काळात म्हणजे इ.स. १०४८मध्ये कर्जत तालुक्यामधील अनेक गावे शिलाहार राजसत्तेतील मुम्मुणिराज या राजाने आपली पत्नी पद्मौ हिच्या कल्याणाकरिता चौदा ब्राह्मणांना दान केले होते. या विधीला ग्रामदान असे म्हणतात. त्याचा ताम्रपट मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आजही पाहता येतो.

सागर सुर्वे हे कर्जत तालुक्यावर अभ्यास करत आहेत. त्यामध्ये त्यांनी शिलाहार राजसत्तेमध्ये दान दिलेल्या



गावांमध्ये अनेक पुरावशेष शोधले आहेत. त्यातील देऊळवाडी गावातील काही मूर्तींनी त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यावर त्यांनी अधिक संशोधन केले व तो शोधप्रबंध गोपीनाथराव मुंडे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मंडणगड आयोजित भारतीय मूर्ती आणि स्थापत्य संशोधन परिषद अंतर्गत दुसऱ्या आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय ई परिषदमध्ये सादर सुद्धा केला आहे. भैरवनाथच्या मंदिरामुळे देऊळवाडी नावाने हे गाव आता ओळखले जात आहे. या देवळाच्या परिसरात मध्ययुगीन काही मूर्ती आहेत. मात्र त्यांची दखल घेतली गेली नसल्याने त्या वातावरणाशी झुंजत आपली अस्तिव कशाबशा टिकवून आहेत.

कर्जत तालुक्यात प्रथमच आढणाऱ्या मूर्तीशास्त्रानुसार सात्विक वर्गातील क्षेत्रपाळ महत्त्वाचा आहे. दुसरी मूर्ती ही असितांग वर्गातील भैरवाची आहे. दोन्ही मूर्ती मध्ययुगीन असून त्या काळात पंचक्रोशीत त्यांचे उत्सव व मानपान फार मोठ्या प्रमाणावर केला जात असे. हा ठेवा लुप्त व्हायला नको यासाठी सुर्वे यांचा प्रयत्न आहे.

क्षेत्रपाल हा एक पुरातन देव आहे. ऋग्वेदात तो क्षेत्रस्य पती या नावाने आढळतो. वैदिक आर्य काळात माणूस भटक्या अवस्थेतून शेती करण्यासाठी स्थिरावला तेव्हाच हा देव उत्पन्न झाला. क्षेत्र म्हणजे शेत आणि त्याचे रक्षण करणारा म्हणजे क्षेत्रपाल होय. अशी तज्ञांनी त्याची व्याख्या केली आहे. क्षेत्रपाळाला कोकणात खेत्री असे म्हणतात. प्रयोगसार नावाच्या ग्रंथात क्षेत्रपालाची पूजा सर्वप्रथम मग शिवाला षोडोपचार सांगितलेला आहे. अन्यथा तो शिवपूजेची सुकृत नष्ट करतो, अशी नोंद आहे. या वाक्याच्या अभ्यास भौगोलिक दृष्टिकोनातून केला असता, देऊळवाडी गावामध्ये शिलाहारकालीन शिवाचे मंदिर अगदी वेशीवर आहे. कर्जत तालुक्यामध्ये क्षेत्रपाळ ही दुर्मिळ देवता आहे. त्या काळात क्षेत्रपालाचा उत्सव जूनमध्ये करण्यात येत असे. तोपर्यंत पिकाची लावणी केली जात नसे, अशी प्रथा प्रचलित होती.

भैरव ही देवता ग्रामदैवत आहे. पुराणानुसार भैरव हा शिवाच्या रक्तातून उत्पन्न झाला. शैव आगम या ग्रंथात भैरवांची एकूण संख्या चौसष्ट सांगितलेली आहे. प्रत्येकी आठ असे त्याचे अष्टअंग होतात. चौसष्ट भैरवांमध्ये मुख्य म्हणजे काळभैरव होय. इथे असलेला भैरव मात्र असितांग वर्गातील आहे. प्राचीनत्वाचे दाखले सुमारे नऊ वर्षांपूर्वी कर्जत तालुक्यातील आंबिवली येथे एका घराच्या खोदकामाच्या वेळी विविध आकारातील मोठं मोठी प्राचीन दगडी शिल्प आढळून आली. यामध्ये काही मोठ्या पिंडी सुद्धा होत्या.

### पळसदरी वर्णे येथे प्राचीन काळातील पाच विहार दुर्लक्षित

कर्जत जवळील पळसदरी वर्णे येथे प्राचीन काळातील पाच विहार असलेली एक दुर्लक्षित लेणी आहे. देशातून कोकणात उतरणाऱ्या अनेक घाटवाटा व व्यापारी मार्गावर रात्रीच्या मुक्कामाची सोय व्हावी म्हणून अशा प्रकारच्या लेण्यांची निर्मिती त्यावेळी केली जात असे. मात्र याबद्दल फारसे कोणालाच माहित नसून ती आजवर दुर्लक्षित राहिली आहे. अशा अनेक वास्तू कर्जतच्या प्राचीनत्वाचे दाखले देत आहेत.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नो एंट्रीत प्रवेश करणे, सीटबेल्ट, काळ्या काचा व हेल्मेट न वापरणाऱ्यांविरुद्ध पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे हे स्वता रस्त्यावर उतरत कारवाईची धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. त्याचबरोबर अगामी काळात मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती पनवेल शहर वाहतुक शाखेकडून देण्यात आली.

राज्यात हेल्मेट सक्ती मोठ्या प्रमाणात गाजत आहे. मोठमोठ्या शहरात याबाबत अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात प्रबोधन आणि जनजागृती करण्यात येत आहे. परिसरात आता दुचाकीस्वार हेल्मेट घालूनच प्रवास करीत आहेत. काही अपवाद वगळता हेल्मेट न चुकता घातले जात आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे वाहतुक शाखेने बिगर हेल्मेटविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. वास्तविक पाहता हेल्मेट घालणे हे दुचाकी स्वाराच्या फायद्याचे आहे. यामुळे कित्येकदा अपघातात प्राण वाचतात याचे कारण म्हणजे डोक सुरक्षित राहते त्याला मार लागत नाही. असे असतानाही काही दुचाकीस्वार हेल्मेट घालत नसत त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई पनवेल शहर वाहतूक शाखेने केली आहे.



या वेळी उरण नाका येथून टपाल नाकाकडे नो एंट्रीत प्रवेश करणे, चारचाकी वाहनांना कालाय काचा, सीटबेल्ट, ट्रिपल शिट, अशी धडक मोहीम राबविण्यात आली आहे. या वेळी पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे शनिवारी सकाळी दहा वाजल्यापासून पनवेल परिसरात रस्त्यावर उतरून कारवाई करीत असल्याने कोणाचीही गय केली जात नाही. कर्मचाऱ्यांनाही हेल्मेट न वापरणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

> **आम्ही सीटबेल्ट न वापरणे, काळ्या काचा, नो एंट्रीत प्रवेश करणे, विना हेल्मेट चालणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईची विशेष मोहीम हाती घेतली आहे. याबाबत जनजागृतीही करण्यात आली. त्याचा परिपाक म्हणजे हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या कमालीची वाढली आहे. त्यामध्ये आनखी भर पडेल असा विश्वास आम्हाला वाटतो.**
> **-संजय नाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक शाखा**

विना हेल्मेट, सीटबेल्ट, व काळ्या काचा वापरणे अश्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. त्याचबरोबर अनेक वाहनाला काळ्या काचा वापरल्या जातात, तसेच सीटबेल्टचादेखील वापर करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार अश्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये पाच कर्मचारी व एक अधिकारी यांनी ही कारवाई केली.

## हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे व नवी मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नेरूळ पामबीच मार्ग येथे आयोजित करण्यात आलेला हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रम उत्साहात झाला.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, हॅप्पी स्ट्रीट सारखे सकाळी होणारे कार्यक्रम कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली तीन वर्षे घेण्यात आली नव्हती. नागरिकांचे आरोग्य सुदृढ व्हावे, त्यांचे जीवन तणावमुक्त राहावे याकरिता योगसाधना, झुंबा, सायकलिंग, स्केटिंग, चित्रकला, हस्तकला, आर्ट असे विविध कार्यक्रमाची मेजवानी आज नवी मुंबई महापालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घेण्यात आला. नवी मुंबईतील नागरिकांनीही सदर कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला असून पर्यावरण दिनानिमित्त दिंडी, छोटा भीम, मिकी माउस, हनुमान अशाविविध प्रकारच्या वेषभूषा केलेल्या पात्रांनीही सदर कार्यक्रमात रंगत आणली. पुढील रविवारी १२ जून २०२२ रोजीही अशाच प्रकारचा कार्यक्रम आयोजित केला असून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

या वेळी महापौर जयवंत सुतार, भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी सभापती डॉ. जयाजी नाथ, नेत्रा शिर्के, नगरसेवक सुनील पाटील, अशोक गुरखे, विनोद म्हात्रे, सुरेश शेट्टी, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, विकास सोरटे, जगनाथ जगताप, पांडुरंग आमले, राजेश राय, राजू तिकोने, शशी नायर, सुहासिनी नायडू, ज्योती पाटील, रणजित नाईक, राखी बुर्गे, अपर्णा पांढरे, न.मुं.म.पा. उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार, बाबासाहेब राजळे, शहर अभियंता संजय देसाई, वैद्यकीय अधिकारी उज्वला ओतूरकर, बेलापूर विभाग अधिकारी मिताली संचेती, जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, लहान मुले उपस्थित होते.

कार्यक्रमात योग विद्या निकेतन, प्रजापती बिल्डर्स, सायली आर्ट झोन, स्वेडी डान्स फिटनेस अकादमी, पाम रोलर स्केटिंग अकादमी यांनी सहभाग नोंदवला. उपस्थित ज्येष्ठ नागरिक व महिलांनी सदर कार्यक्रम पुन्हा सुरू केल्यामुळे नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना व्यक्त करत आमदार मंदा म्हात्रे व आयोजकांचे आभार मानले.

## दिव्यांगांचे उद्यान अंधारात

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील दिव्यांगांच्या संवेदना उद्यानातील विद्युत दिव्यांची मोडतोड झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून उद्यानातील विद्युत दिवे बंद पडले आहेत. त्यामुळे दिव्यांगांची मोठी गैरसोय होत आहे.

सानपाडा सेक्टर १० येथे नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी संवेदना या उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे, परंतु, देखभाल आणि दुरुस्तीच्या अभावामुळे या उद्यानात विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून विद्युत व्यवस्था बंद आहे. दिव्यांचीही मोडतोड करण्यात आली आहे. त्यामुळे उद्यानात येणाऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. स्पर्शज्ञान, सुगंध, जाणीव, ध्वनी, चव या पंचद्रियांवर आधारित संकल्पनेवर संवेदना हे उद्यान विकसित करण्यात आले आहे, परंतु उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. उद्यानातील विद्युत पुरवठा बंद असून, अनेक दिव्यांची मोडतोड झाली आहे. त्यामुळे संध्याकाळी उद्यानात अंधार पसरलेला असतो, तसेच उदयानातील रेलिंगची देखील दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे देखभाल व दुरुस्तीच्या अभावामुळे उदयानात बंद असलेली विद्युत व्यवस्था तसेच रेलिंगची दुरूस्ती तातडीने करण्याची मागणी होत आहे.

## तरुणीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

अभ्यास कमी झाल्याच्या नैराश्यातून वीस वर्षीय तरुणीने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील देवद येथे घडली आहे.

वीस वर्षीय तरुणी नीटच्या परीक्षेसाठी अभ्यास करत होती. तिला एमबीबीएस परीक्षेत मार्क कमी पडले. यामुळे अभ्यास कमी झाल्याच्या नैराश्यातून या तरुणीने फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना देवदे येथे घडली. या प्रकरणाची माहिती खांदेश्वर पोलिसांनी दिली आहे.

## वेश्वीतील आदिवासींना अन्नधान्याचे वाटप

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था, उरण रायगड आणि सुधीर घरत सामाजिक संस्था नवघर यांच्या संयुक्त विद्यमाने वेश्वी आदिवासी बांधवाना सिया जयप्रकाश पाटील हिच्या प्रथम वाढदिवसाच्या निमित्त अन्नधान्य व सामानाचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाला जाणता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विवेक पाटील, नवघर ग्रामस्त मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाटील, चाईल्ड केअर संस्थेचे अध्यक्ष विकास कडू, नवघर ग्रामपंचायतीच्या सदस्य मयुरी पाटील, वेश्वी आदिवासी शाळेचे मुख्याध्यापक रमणिक म्हात्रे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम उत्तमरित्या पार पडण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष विक्रांत कडू, कार्याध्यक्ष ह्रितिक पाटील, खजिनदार हर्षद शिंदे उपाध्यक्ष मनोज ठाकूर, सदस्य विपुल कडू, रोशन धुमाळ आणि विवेक कडू आदींनी मेहनत घेतली.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत ५ जूनच्या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'पंचतत्वाचे संरक्षण - वसुंधरा संवर्धन' विषयावरील चित्रकला स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या तसेच खाजगी शाळांतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या मनातील पर्यावरण संकल्पनांना चित्ररूप दिले. शाळांना उन्हाळी सुटी असतांनादेखील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता.



चित्रकला स्पर्धास्थळी भेट देत महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. अतिरिक्त आयुक्तजसंजय काकडे, शिक्षण विभागाचे उपायुक्त जयदीप पवार यांनीही या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील उत्कृष्ट चित्रांना अनुक्रमे प्रथम पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये आणि तृतीय दोन हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच यातील निवडक उत्तम चित्रांचे प्रदर्शनही वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित केले जाणार आहे.

## पनवेलमध्ये होणार 'पेपरफ्राय'चा नवीन स्टुडिओ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ईकॉमर्स फर्निचर आणि गृहोपयोगी वस्तू कंपनी पेपरफ्रायने नवी मुंबईतील पनवेल येथे आपला नवीन स्टुडिओ सुरू करण्याची घोषणा केली आहे. ऑफलाइन विस्तार हा भारतातील विशिष्ट बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याच्या आणि घर आणि राहत्या बाजारपेठेत सर्वदूर व्यवसाय उभारणीच्या कंपनीच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने आहे. पेपरफ्रायच्या स्टुडिओचा विस्तार सध्या देशातील १६०हून अधिक स्टुडिओसह ८०हून अधिक शहरांमध्ये पसरलेला आहे.

कंपनीने २०१४मध्ये आपला पहिला स्टुडिओ सादर केला. प्रम्भा एंटरप्रायझेसच्या भागीदारीत सुरू केलेला नवीन स्टुडिओ पनवेलमधील ओरियन मॉलच्या समोर एका प्रमुख ठिकाणी ५२६ चौरस फूट चटईक्षेत्रात वसलेला आहे. पेपरफ्राय वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या १ लाखाहून अधिक उत्पादनांच्या भिन्न पोर्टफोलिओमधून काळजीपूर्वक निवडलेल्या फर्निचर आणि घरगुती उत्पादनांच्या मोठ्या कॅटलॉगचा अनुभव ग्राहकांना प्रथमच उपलब्ध करून देतो. ग्राहकांना कंपनीच्या इंटीरियर डिझाइन सल्लागारांकडून विशेष डिझाइन सल्लाही मिळेल. पनवेल येथील स्टुडिओचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील नवी मुंबई येथील घर आणि ग्राहकांच्या विशिष्ट गरजांनुसार खरेदीचा अनुभव प्रदान करणे हे आहे.

पेपरफ्राय दर महिन्याला सुमारे आठ-नऊ फ्रेंचायझी सादर करते. जून २०२१मध्ये सादर केलेला पेपरफ्राय ॲक्सीलेटर प्रोग्रॅम पेपरफ्रायच्या ऑफलाइन फूटप्रिंटचा विस्तार करण्यासाठी तयार करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आगळे वैशिष्ट्य म्हणजे फ्रँचायझी भागीदारांना आवश्यक असलेले १५ लाख रुपयांपासून सुरु होणारे कॅपेक्स. हे मॉडेल १०० टक्के किमतीच्या समानतेवर आधारित आहे आणि भागीदाराला उत्पादन यादी ठेवण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे ते परस्पर फायदेशीर व्यवसाय संघटन बनते.

## नवी मुंबई पालिकेच्या ताफ्यात अद्ययावत सफाई वाहन दाखल



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेसाठी मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. या कंपनीकडून सीएसआर उपक्रमांतर्गत जेटींग, रॉडींग व ग्रॅबींगची एकत्र सुविधा असलेले वाहन उपलब्ध झाले आहे. मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या वतीने महापालिका आयुक्त श अभिजित बांगर यांच्या उपस्थितीत या अद्ययावत वाहनाचे हस्तांतरण नवी मुंबई महानगरपालिका वाहन विभागाकडे करण्यात आले आहे.

या वाहनासोबत कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कन्फाईंड स्पेस एन्ट्री किट, ट्रायपॉड, एअर व्हेंटिलेशन फॅन, एअर ब्रेथींग पॅरेटस, ऑक्सिजन सिलींडर, मल्टिगॅस डिटेक्टर, हेल्मेट विथ टॉर्च, रोप लॅडर अशी अत्याधुनिक सुरक्षा साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

हे वाहन हलक्या व्यावसायिक प्रकारच्या चेसीसवर (LCV) बांधणी करण्यात आलेले असल्याने नमुंमपा क्षेत्रातील लहान तसेच अरुंद गल्ली व रस्ते या ठिकाणी असलेल्या मल:निस्सारण वाहिन्या सफाईसाठी या वाहनाचा प्रभावीपणे वापर करता येईल. वाहनावर जेटींग, रॉडींग व ग्रॅबींग या तीन सुविधा एकत्र उपलब्ध असल्याने मलनि:स्सारण साफसफाईच्या कामासाठी हे वाहन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या वाहनांवरील जेटींग पंपाच्या सहाय्याने मलनि:स्सारण वाहिन्या डि चोक, डि स्लिट आणि स्वच्छ करता येतील. या वाहनामध्ये ट्रॉलीवर बसविलेले रॉडींग मशिन उपलब्ध करुन दिलेले असून या मशीनच्या सहाय्याने मलनि:स्सारण वाहिन्यांमधील अडकलेला व साठून राहिलेला प्लास्टीक, पेपर, झाडाची वाळलेली पाने, मुळे, विटा तसेच इतर प्रकारचा कचरा साफ करता येईल.

या वाहनावर ग्रॅबींग सुविधा उपलब्ध करुन दिलेली असून त्याच्या सहाय्याने मलनि:स्सारण वाहिन्यांच्या मशीनहोल मधील २० फूटापर्यंतचा साचलेला गाळ व कचरा बकेटच्या सहाय्याने बाहेर काढून वाहनावर बसविलेल्या हॉप्पर ट्रे मध्ये जमा केला जाऊ शकतो व नंतर त्याची विल्हेवाट लावली जाऊ शकते. मलनि:स्सारण वाहिन्यांची मानवी संपर्कविरहीत साफसफाई व मशीनहोल मधील साचलेला गाळ काढण्यासाठी सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अभियानामध्ये या मशीनचा मोठ्या प्रमाणात वापर करता येणार आहे.



## नेरूळमध्ये पर्यावरण दिनी वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सौजन्याने आणि युगांतर मित्र मंडळाच्या वतीने श्री झोटिंगदेव बामणदेव मैदान परिसरात जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण करण्यात आले. यापूर्वी मंडळाच्या वतीने हजारो झाड लावून त्यांचे संवर्धन करत असल्याचे मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने एक देशी झाड लावून त्याच्या संगोपनाची जबाबदारी घेतली पाहिजे असे मंडळाच्या अध्यक्षांनी आवाहन केले. वृक्षारोपण केलेल्या सर्व झाडांच्या संवर्धनाची आणि संगोपनाची जबाबदारी युगांतर मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी घेतली आहे.

या वेळी संस्थापक अध्यक्ष रवींद्र भगत, दर्शन म्हात्रे, नंदेश भगत, श्रीकांत ठाकूर, मयूर पवार, जयु पवार, दिंगंबर गिरी, योगु म्हात्रे, मंगेश कदम उपस्थित होते.

## बेल डोंगरीवर जागतिक पर्यावरण दिन साजरा

**उरण : बातमीदार**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी जागरुकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अनेक स्तरांवर विविध कार्यक्रम राबविले जातात. त्याच उद्देशाने उरण विधानसभा मतदार संघातील तीन सामाजिक संस्था एकत्रित येऊन चिरनेर परिसरातील चांदायली वाडीजवळील बेलडोंगरीवर दोन वटवृक्षांचे रोपण करण्यात आले. शिवाय गेल्या वर्षी लागवड केलेल्या झाडांना पाणी व तेथील परिसराची स्वच्छता करण्यात आली.

यंदाच्या पावसाळ्यात बेलडोंगरीवर स्वर्गीय आंनद मढवी यांची स्मृती जागवण्याच्या दृष्टीने शेकडो देशी वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतला असुन त्या परिसरात आत्तापर्यंत रोपलागवडीसाठी ९० खड्डे मारण्याचे काम पुर्णत्वास आले. आज वाढत्या तापमानवाढीचा आणि वायु प्रदुषणाचा विचार करता सर्वांनी या पावसाळ्यात एक तरी देशी झाड लावून वसुंधरेच्या संरक्षणासाठी कटीबध्द राहु या असा संदेश देत पर्यावरण दिन वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमासाठी वनविभाग परिमंडळ -१ चे अधिकारी संजय पाटील, जासई विभागाचे वनपाल विश्वनाथ म्हात्रे, वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रायगड भूषण मनोज पाटील, वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी, धनंजय तांबे, वसंत वळकुंडे, दिलीप मढवी, काशिनाथ खारपाटील, सतीर म्हात्रे, दिनेश जगताप, मनोहर फुंडेकर, केशव ठाकूर, विनीत मढवी आदी पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपुरात एक मार्गिका दुहेरी वाहतुकीसाठी खुली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अंडरपास एक मार्गिका दुहेरी वाहतुकीसाठी शनिवारी सायंकाळी खुली करण्यात आली. पोलादपूरचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यांच्यासह वाहतूक उपनिरीक्षक आदिंच्या प्रमुख उपस्थितीत एलॲण्डटी ठेकेदार कंपनीच्या अभियंत्यांनी फित कापून या मार्गिकेचे उद्घाटन केले. पोलादपूर शहरातील महामार्ग आता चक्क ३५ फुट खोल भूमिगत जाणार असून पोलादपूर शहर कधी गेले हे अंडरपास महामार्गावरील वाहनांच्या लक्षातदेखील येणार नाही.



(छाया : शैलेश पालकर)

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर शहरातील भूसंपादन ४५ मीटर रूंदीचे झाले असताना या ठिकाणी बॉक्स कटींग पद्धतीने खोदकाम करण्यात येऊन शहरातून भुपृष्ठावरुन जाणारा राष्ट्रीय महामार्ग आता अंडरपास म्हणजे भूमिगत जाणार आहे. शनिवारी सायंकाळी अंडरपास महामार्गावरील एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात येऊन पूर्वेकडील सर्व्हिस रोडवरून होणारी दुहेरी वाहतूक या भूमिगत अंडरपास राष्ट्रीय महामार्गावरून वळविण्यात आली आहे.

पोलादपूर शहरातील पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील सर्व्हिस रोडचे बांधकाम अद्याप पूर्ण झाले नसून गटारसदृश्य फुटपाथदेखील अपुर्णावस्थेत आहेत. येत्या पावसाळ्यात पूर्वेकडील सर्व्हिस रोड सक्षम न झाल्यास त्यातून लालमाती ढासळून अंडरपास राष्ट्रीय महामार्गावर कोसळण्याचा धोका अधिक आहे. ठेकेदार एलॲण्डटी कंपनीने रात्रंदिवस काम करून बॉक्सकटींग केलेल्या अंडरपास राष्ट्रीय महामार्गाच्या खंदकाच्या दुतर्फा काँक्रीटचे फोमिंग करुन लालमातीचे ढिगारे अंडरपासच्या खंदकातून भूमिगत जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर कोसळू नये यांची दक्षता घेतली आहे. मात्र पोलादपूर शहरातील हा अंडरपास वाहतुकीचा प्रयोग प्रवासासाठी किती सुरक्षित असेल, हे येणाऱ्या काळातील अपघाताच्या संख्येसह सर्व्हिस रोडमधून लाल मातीचे ढिगारे कोसळून वाहतूक ठप्प होण्याच्या घटनांच्या प्रमाणावरून स्पष्ट होणार आहे.

### महामार्गामुळे पोलादपूरची अशी स्थिती

**पोलादपूर शहराचा काही भाग हा मुंबई गोवा-राष्ट्रीय महामार्गावरून गायब झाले आहे. पोलादपूर महाबळेश्वर-वाई-सुरूर रस्त्याचाही या चौपदरीकरणाच्या राष्ट्रीय महामार्गापासून संबंध तुटला आहे. केवळ सर्व्हिस रोडद्वारे पोलादपूर शहराबाहेरील सडवली रस्त्यावर तसेच श्री काळभैरवनाथ मंदिर कमानीजवळ गेल्यानंतरच महाबळेश्वरहून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना भूमिगत महामार्गाशी संपर्कात येणे शक्य होणार आहे.**

## मुरुड शहरात वारंवार वीज गायब

### नागरिक त्रस्त; वीज वितरणचे दुर्लक्ष

**मुरुड जंजिरा: प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून मुरुड शहरातील वीज तासन्तास गायब होत आहे. त्यामुळे येथील स्थानिक नागरिक त्रस्त आहेत.

सध्या मुरुड शहरात तापमान ३२डिग्रीपेक्षा जास्त सेल्सिअस असल्याने सर्वांना घामाच्या धारांना सामोर जावे लागत आहे. त्यात वीज वारंवार खंडित होत आहे वीज गायब होत असल्याने छोट्या व्यावसायिकांचे नुकसान होत आहे. पाऊस नसतानासुद्धा वीज जात असल्याने वीज गायब होण्याचे कारण मात्र लोकांना सांगण्यात येत नाही. मुरुडला पाब्रे येथुन वीज पुरवठा होत आहे, परंतु गेल्या काही दिवसांपासून येथून सुध्दा वीज वारंवार वीज खंडीत आहे. दिवसाला कधी दोन तास ते कधी चार तास वीज जात असल्याने नागरिक खूप संतप्त झाले आहेत.उष्णता वाढल्याने लोकांना दिवसा वीज पुरेसी मिळत नसल्याने खूप त्रास सहन करावा लागत आहे. वीज गेल्यानंतर लोक ज्यावेळी वीज अधिकारी यांना फोन लावतात, तेव्हा एक तर त्यांचा दूरध्वनी बंद अन्यथा कव्हरेज क्षेत्राबाहेर असल्याचे संदेश मिळतात. त्यामुळे नागरिक या परिस्थितीला कंटाळले आहेत. हीच स्थिती राहिली तर पावसाळ्यात काय होणार हा मोठा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. मुरुडचे वीज अधिकारी विद्युत खांबावर चढत नसल्याने वीजेची समस्या लवकर सापडत नाही. या मुळे वीज जाण्याचे प्रमाण अधिक वाढले आहे. मुख्य अधिकारी यांनी याकडे लक्ष देऊन वीज कशी सुरळीत राहिलं त्याकडे पाहावे आणि नागरिकांना विजेपासून दिलासा द्यावा अशी मागणी आहे.

केव्हाही दुरुस्तीच्या नावाखाली आठ तासाचे लोडशेडींग घेतले जाते. त्यामुळे असंख्य लोकांचे आर्थिक नुकसान होत आहे. ग्रामीण शहरी भागात वीज सातत्याने जात असल्याने नागरिक खूप त्रस्त आहेत. मात्र वीज वितरणचे याकडे दुर्लक्ष आहे.

## कर्जत शहरातील नालेसफाई अंतिम टप्प्यात

**कर्जत : प्रतिनिधी**





कर्जत शहरात असलेले नाले आणि गटारे यांची सफाई ही पावसाळ्यापूर्वी करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी कर्जत नगरपरिषदेकडून शहरातील ३० किलोमीटरचे लहान मोठे नाले यांची साफसफाई ठेकेदाराकडून केली जात असून ती अंतिम टप्प्यात असल्याची माहिती पालिकेच्या नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी दिली.

कर्जत नगर परिषद क्षेत्रातून उल्हास नदी वाहत असून पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीच्या काळात शहरातील काही भागात पऊरचे पाणी शिरत असते.

जुलै २०२१मध्ये आलेल्या महापुरामध्ये उल्हास नदीचे पाणी नागरी वस्तीत घुसले होत. त्यात पूर येऊन दहीवली, इंदिरानगर बामचामळा, मुद्रे गुरुनगर तसेच कर्जत कोतवालनगर भागात पुराचे पाणी शिरुन काही कुटूंबांचे नुकसान झाले होते. त्यामुळे सन २०२२चे पावसाळ्यांत संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत. नगर परिषद क्षेत्रात पवसाचे पाणी साठून काही हानी होऊ नये यासाठी नगर परिषद क्षेत्रातील सर्व नाले आणि गटारांची पावसाळ्यापूर्वी जे. सी. बी. व्दारे व कामगारांव्दारे साफसफाईचे काम पालिकेने हाती घेतले आहे.

कर्जत शहरात असलेल्या ३० किलोमीटर लांबीच्या नाल्यांची सफाई पावसाळ्यापूर्व कामांमध्ये केली जात आहे. पावसाळा तोंडावर आल्याने शहरातील उपनद्यांची सफाई जवळपास पूर्ण झाली आहे. मुख्य नाल्यांची सफाई पालिकेच्या आरोग्य विभागाकडून सुरु आहे. पॅलिएक हद्दीतील भिसेगाव, गुंडगे, मुद्रे आणि दहिवली भागातील मोठ्या गावातील नाल्यांची सफाई जेसीबी मशीन आणि कंत्राटी कामगार यांच्या सहाय्याने नालेसफाई सुरु केली आहे.

या महिन्यात सर्व नालेसफाई सुरु असून आम्ही सातत्याने नालेसफाई कामाची पाहणी करीत आहोत अशी माहिती कर्जत नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे यांनी दिली आहे. पावसापूर्वी कामे होणार या मुळे नागरिकांमध्ये समाधान आहे.

> **नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेवून आरोग्याच्या अनुषंगाने नियमित स्वच्छता राखण्याचे आरोग्य यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. आरोग्य विभाग त्यावर चांगले काम करून घेत आहे. संबंधित विभागाला नागरिकांकडून सूचना, तक्रारी समजून घेऊन नव्या जोमाने आता दररोज सफाई, स्वच्छताकामाला सुरुवात करण्यात आली आहे.**
> **-सुरेखा भणगे, मुख्याधिकारी**

## नेरळ येथे अखंड ज्ञानयज्ञ सोहळा

**कर्जत :** नेरळ येथील संत ज्ञानोबा तुकोबा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अखंड ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. नेरळ मोहाचीवाडी येथे असलेल्या अध्यात्मिक शिक्षण संस्थेत अडीच दिवसांचा अखंड ज्ञानयज्ञ सोहळा कैलाश महाराज भोईर यांच्या माध्यमातून झाला.

या सोहळ्यामध्ये संगीत भजन श्रीपती बाबा महाराज भजन मंडळ कोलिवली येथील गायिका चंदना आत्माराम डांगरे हिने आणि पनवेल कामोठे येथील संत वामनभाऊ भगवानबाबा महिला भजन मंडळ यांची गायिका प्रमिला नागरगोजे यांनी सादर केले. त्यानंतर या अखंड ज्ञानयज्ञ सोहळ्यात प्रवचन चांदई येथील गजानन कोळंबे आणि हालीवली येथील निवृत्ती महाराज शिंदे यांचे झाले. रात्रीचे हरिकिर्तन कवठेवाडी येथील हरिभाऊ महाराज पारधी यांचे झाले.

## कर्जतमध्ये दीड लाख रोपे तयार

### लागवडीसाठी सामाजिक वनीकरण विभाग सज्ज

**कर्जत : बातमीदार**

वन विभाग दरवर्षी लाखो झाडांची लागवड जून ते सप्टेंबर महिन्यात वन महोत्सव साजरा केला जातो. यावर्षी कर्जत तालुक्यात वृक्ष लागवड करण्यासाठी कर्जत सामाजिक वनीकरण विभागाने तब्बल दीड लाख रोपे लावण्यासाठी तयार आहेत. दरम्यान, कर्जत तालुक्यातील सामाजिक संस्था आणि शासकीय संस्था यांच्या माध्यमातून वन महोत्सव काळात वृक्ष लागवड करण्याचे आवाहन वनक्षेत्रपाल नरेंद्र पाटील यांनी केले आहे.



सामाजिक वनीकरण विभाग दरवर्षी पावसाळ्यात वृक्ष लागवड करीत असते. त्यासाठी सहा महिने सामाजिक वनीकरण विभागाच्या कर्जत लाडीवली येथील नर्सरी येथे हे काम सुरु होते. गेली काही वर्षे वन विभागाने वन महोत्सवाची संकल्पना राबविण्यास सुरुवात केली आणि राज्यात पावसाळ्यात लाखो वृक्षांची लागवड केली जाते. यावर्षी कर्जत तालुक्यात वन महोत्सव काळात मोठ्या प्रमाणात झाडे लावली जाणार आहेत. त्यासाठी लाडीवली येथील नर्सरीमध्ये तब्बल एक लाख ५८ हजार झाडे यांची रोपे तयार झाली आहेत. त्या ठिकाणी तब्बल ४२ प्रकारची रोपे तयार करण्यात आली असून त्यात शोभिवंत, जंगली झाडे तसेच औषधी वनस्पती यांची निर्मिती प्रामुख्याने करण्यात आली आहे. तर जमिनीची धूप थांबवून ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या बांबू या वृक्षाची तब्बल एक लाख रोपे तयार करण्यात आली आहेत. ही सर्व रोपे गेली सहा महिन्यापासून घेतलेल्या मेहनतीमुळे तयार करण्यात सामाजिक वनीकरण विभागाला यश आले आहे. त्यासाठी वनपाल मोहन चव्हाण, वनरक्षक वनिता राणे यांच्या मदतीला १५ वन मजूर ही कामे करीत होते.

### *५ जून ते १५ सप्टेंबर वनमहोत्सव*

*कर्जत तालुक्यात ५ जून ते १५ सप्टेंबर या कालावधीत वन महोत्सव साजरा होत आहे. त्यासाठी एक लाख ५८ हजार रोपे तयार करण्यात आली असून स्थानिक संस्था, महाविद्यालय, शाळा यांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीसाठी सामाजिक वनीकरण अल्प दरात रोपे उपलब्ध करून देणार असल्याची माहिती वनक्षेत्रपाल पाटील यांनी दिली आहे.*

# आपत्ती व्यवस्थापनात कोकण सज्ज



**आपत्ती म्हणजे ज्या संकटामुळे राष्ट्राची किंवा समाजाची मोठ्या प्रमाणात जीवित, आर्थिक आणि सामाजिक हानी होते तसेच त्या राष्ट्रावर किंवा समाजावर तिचे दूरगामी परिणाम होतात. अशा संकटाला आपत्ती म्हणतात. आपत्ती या अशा घटना आहेत ज्यांचा मानव आणि पर्यावरणावर मोठा परिणाम होतो. आपत्ती या अनिश्चित असतात. नैसर्गिकआपत्ती ही एक अतिशय भयंकर आणि धोकादायक घटना आहे, जी अचानक घडते. यात घरे, मालमत्ता, वस्तू आणि इतर अनेक प्रकारचे नुकसान होते आणि अनेक मृत्यूदेखील होतात. मानवी चुकांमुळे, त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. मानवाकडून पर्यावरणीय संसाधनांचा गैरवापर होत आहे. ज्वालामुखी, पूर, भूकंप, दुष्काळ, भूस्खलन, चक्रीवादळ, त्सुनामी, हिमस्खलन, गडगडाटासह वादळ, उष्ण लाटा आणि वीज इत्यादी अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती आहेत.**

### धरणांच्या पाणीसाठा विसर्गाचे नियोजन

पावसाळ्यात धरणांमधून होणारा पाण्याचा विसर्ग हा महत्वाचा मुद्दा असतो. पूर नियंत्रण जलसंपदा विभागाचे अधिकारी नियोजनाने व्यवस्थितरित्या करू शकतात. त्या दृष्टीने संबंधित अभियंत्यांनी या काळात कोणत्याही परिस्थितीत धरणाच्या जागेवरच राहावे व मुख्य अभियंता यांच्या परवानगीशिवाय अजिबात मुख्यालय सोडू नये असे निर्देश मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले आहेत. पूर नियंत्रणाच्या दृष्टीने धरणातून किती पाणी कसे सोडण्यात येत आहे ते सर्वसामान्यांना रियल टाईम कळावे म्हणून जलसंपदा विभागाने यंत्रणा विकसित केली असून त्याद्वारे धरण क्षेत्रातील परिसरातील नागरिकांना आगाऊ सूचनाही मिळणार आहेत. विशेष म्हणजे कुणीही व्यक्ती ही माहिती जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवरून १५ जूनपासून लाईव्ह पाहू शकतो.

कोकणाला लाभलेला समुद्रकिनारा आणि डोंगररांगांमुळे कोकणात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीचा सामनाही कोकणाला करावा लागतो. कोकण विभागात एकूण ७ जिल्हे असून ५० तालुके आणि ६ हजार ३५३ गावे आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी २ हजार ते ३ हजार ३६८ मि.मी. पाऊस हा कोकणात पडतो. विशेषत: मुंबई व ठाणे जिल्ह्यात कमी कालावधीत जास्त पाऊस आणि भरतीची वेळ एकच असल्यास पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. कोकण विभागात गेल्या सहा वर्षात सरासरी २ हजार ७०१.४० मि. मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरडग्रस्त गावे आहेत. गेल्यावर्षी कोकणात तौक्ते चक्रीवादळामुळे प्रचंड नुकसान झाले. या वादळाचा प्रभाव इतका होता की कोकणातील दैनंदीन जीवनमान विस्कळीत झाले होते. त्यानंतर काळीज पिळवटून टाकणारी घटना म्हणजे महाड तालुक्यातील तळीये गावात दरड कोसळून तब्बल ३२ घरे दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली गडप झाली. या दुर्घटनेत मालमत्तेच्या नुकसानीबरोबरच प्रचंड जीवितहानी झाली. रत्नागिरी जिल्ह्या रात्रभर कोसळलेल्या पावसामुळे चिपळूणमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. चिपळूणमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे अनेक सोसायटी, घरांमध्ये पाणी शिरल्याने हजारो नागरिक पाण्यात अडकले होते. अशा नैसर्गिक आपत्तीच्या घटनांचासामना कधीही नकळत करावा लागत असतो. यासाठी आपत्ती व्यवस्थापन आणि जनजागृती हे महत्त्वाचे उपाय आहेत.

मानवनिर्मित आपत्ती ही मानवी चुका, निष्काळजीपणा आणि जाणूनबुजून केलेल्या चुकांमुळे उद्भवणारी आपत्ती आहे. मानवनिर्मित आपत्ती मानवी निष्काळजीपणामुळे उद्भवतात. मात्र त्या जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे घडू शकतात आणि चांगल्या नियोजन आणि प्रतिबंधात्मक पद्धतींनी त्या टाळताही येतात. मानवनिर्मित आपत्ती कोणत्याही प्रकारच्या घटना असू शकतात जसे की इमारत कोसळणे, दंगल, दहशतवादी हल्ला, औद्योगिक धोका, चेंगराचेंगरी, आग इ. कोरोना महामारी ही संपूर्ण जगातील सर्वात मोठी मानवनिर्मित आपत्ती होती. त्याचे परिणाम संपूर्ण जगाने अनुभवले आहेत. प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आणि कठोर निर्बंधांमुळे या आपत्तीचा सामना करता आला परंतु यातही अनेक लोकांना आपले जीव गमवावे लागले.

यंदाच्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी पूर्वतयारी केली आहे. पावसाळ्यापूर्वी प्रथमच एनडीआरएफच्या नऊ तुकड्या सात जिल्ह्यांमध्ये तैनात करण्यात आल्या आहेत. ठाणे आणि मुंबईत प्रत्येकी दोन तर कोल्हापूर, सातारा, रायगड, रत्नागिरी, पालघर येथे प्रत्येकी एक टीम १५ जून पासून पोहोचतील. याच पद्धतीने राज्य आपत्ती प्रतिसाद दल म्हणजे एसडीआरएफची एक तुकडी नांदेड व एक तुकडी गडचिरोली येथे १५ जून ते १५ सप्टेंबर या कालावधीत तैनात करण्यात येत आहेत. आपत्कालीन कालावधीत शून्य जीवितहानी हे उद्दिष्ट ठेवून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. जलसंपदा विभागाने धरणसाठ्यातील पाणी सोडण्याबाबत योग्य नियोजन करून संबधित अधिकाऱ्यांना मुख्यालयाच्या ठिकाणी राहण्याबाबत आदेशीत करावे, अशा सूचना शासनाच्या मान्सुनपूर्व बैठकीत केल्या आहेत.

### विभागीय आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष

कोकण भवन, नवी मुंबई-०२२-२७५७१५१६
मुंबई शहर-०२२-२२६६४२३२
मुंबई उपनगर-०२२-२६५५६७९९/२६५५६८०६
ठाणे-०२२-२५३०१७४०/२५३८१८८६
पालघर-०२५२५-२९७४७४
रायगड-०२१४१-२२२११८
रत्नागिरी-०२३५२-२२२२३३/२२६२४८
सिंधुदुर्ग-०२३६२-२२८८४७

नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर पूर्वतयारी करण्यात येत आहे. तरीदेखील संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्वाचा आहे. विभाग स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी समन्वय साधण्यात येत असून मान्सूनपूर्व तसेच पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तीमध्ये सुरक्षा व्यवस्था कशी ठेवण्यात यावी त्यादृष्टीने जिल्हा स्तरापासून ग्रामपातळीपर्यंत आराखड्यानुसार उपाययोजना करण्यात येत आहेत. आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्थानिक पातळी ही देखील महत्वाची आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या वतीने जिल्हास्तरावर जिल्हा आपत्ती आराखडा तयार करणे तो अद्यावत करणे, विविध कार्यशाळा आयोजित करणे तसेच रंगीत तालीम आदी उपक्रम जिल्हा व तालुका पातळीवरील कार्यक्रमात राबविण्यात येतात. गाव आपत्ती व्यवस्थापन समिती आदी सदस्यांचे प्रशिक्षण, कार्यलयीन कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारी यांचे प्रशिक्षण तसेच लोकसहभाग वाढविण्यासाठी पथनाट्य, जाहिरात फलक, पोस्टर्स स्पर्धा, आदी कार्यक्रमाव्दारे जनजागृती करण्यात येते. निर्माण होणारी संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. याशिवाय पूरपरिस्थीतीमुळे साथ रोगांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा, विद्युत पुरवठा सुरळित ठेवण्यासाठी महावितरण कंपनी, दुरध्वनी सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी दुरसंचार विभाग, रस्त्यांने वाहतूकीचा संपर्क असावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, पाटबंधारे विभाग व इतर संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. आपतकालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, होमगार्डस, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आदीचा प्रामुख्याने सहभाग असतो. तसेच आपतकालीन परिस्थितीमध्ये ग्रामस्थांनी देखील हिरीरीने पुढाकार घेऊन सुरक्षा व्यवस्थेला सहकार्य करण्याची गरज आहे. कोकण विभागीय आयुक्तांनी पावसाळा सुरु होण्याआधीच आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेणाऱ्या बैठका घेऊन आपली पुर्वतयारी केली आहे. या बैठकीत देण्यात आलेल्या सुचनांनुसार गावोगावी आपत्ती व्यवस्थापन समितीच्या सभांचे नियोजन करण्यात येत आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत आहे.

नागरी क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी करण्यात आली असून, आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. नाले आणि गटारसफाईच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे. पूर नियंत्रणाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. साथरोगांचे नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधात्मक औषधसाठा व जंतुनाशके फवारणीचे नियोजन, धोकादायक इमारती बाबत उपाययोजना, रस्ते व पूल दूरुस्ती, आपदग्रस्तांसाठी तात्पुरत्या निवाऱ्याची सोय, आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.

**-प्रवीण डोंगरदिवे, माहिती सहाय्यक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

### उपलब्ध साधन सामुग्री

कोकण विभागात ठाणे जिल्ह्यातील भातसा, बारवी, तानसा व मोडकसागर अशीमोठी ४, पालघर जिल्ह्यातील सूर्या-धामणी, वांद्री-पालघर, कुर्जे-डहाणू अशी मोठी तीन, रायगड जिल्ह्यातील हेटवणी, भीरा व डोलवहाल असे मोठे दोन लघु प्रकल्प २८, रत्नागिरी जिल्ह्यात मोठे दोन लघु प्रकल्प ४६, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तिलारी हे मोठे एक मध्यम प्रकल्प एक लघु प्रकल्प २३ असे एकूण मोठे १०, मध्यम तीन आणि लघु प्रकल्प ९७ आहेत. या धरणांच्या पाणीसाठा विसर्गाचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी कोकण विभागातील जिल्ह्यांच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडे लाईफ जॅकेट ११६६, बोटी ७७, लाईफ बोई ८४२ एवढी सुस्थितीत असलेली साधन सामग्री उपलब्ध आहे. कोकण विभागात आपत्ती झाल्यास संबधित क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# उलवे सायक्लोथॉन २०२२





































हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**